# प्रकरण ३

# धर्म व स्त्रिया

## ( Religion and Women )

'धर्म' हा प्रत्येक मानवी समाजाचे अत्यंत महत्त्वाचे अंग होय. धर्माशिवाय समाज ही संकल्पना संभवत नाही. मानवाच्या जीवनाची दिशा ठरविणारे महत्त्वाचे घटक हे धार्मिकच आहे. मनुष्याच्या जन्माबरोबरच कोणत्या ना कोणत्या धर्माचा ठसा त्याच्या पाठीवर मारला जातो.

प्रत्येक धर्माची नावे वेगवेगळी असली तरी प्रत्येक धर्माची उभारणी ही परमेश्वराच्या संकल्पनेतूनच झाली यात शंका नाही. प्रत्येक धर्माचा आधार हा परमेश्वर व परमेश्वरनिर्मित शक्ती हाच आहे.

फ्रेजरच्या मते ''धर्म म्हणजे मनुष्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्या शक्तीवरील श्रद्धा होय. या शक्ती सर्वसाधारणपणे नैसर्गिक रचना व मानवी जीवन यासंबंधी मार्गदर्शन करून त्यावर नियंत्रण प्रस्थापित करतात.''

भारत हा आदिकालापासून धर्मप्रधान देश आहे. प्राचीन भारतीयांच्या जीवनविषयक आदर्शात धर्म हा सतत केंद्रस्थानी राहिला आहे. 'घृ' या संस्कृत धातूपासून धर्म हा शब्द तयार झाला. त्याचा अर्थ धारण करणे असा आहे. 'धारयति इति धर्मः' अशी धर्माची व्याख्या करण्यात येते. 'समाजाची धारणा करतो तो धर्म'. ज्या तत्त्वाच्या आधारे समाज नीट व सुरक्षित चालतो तो धर्म. प्राथमिक व व्यापक स्वरूपाच्या धर्माला कालाच्या ओघात संकुचित, संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले.

भारतात वैदिक धर्म, जैन धर्म, बौद्ध धर्म, शीख धर्माची स्थापना झाली तर इस्लाम व ख्रिस्ती या धर्मांचा प्रसार व प्रचार झाला. प्रत्येक धर्माची उद्दिष्टे आणि स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगवेगळा होता. धर्म संस्थापनाचे, प्रवर्तनाचे व व्यवस्थापनाचे काम पुरुषांनी केले असले तरी खऱ्या अर्थाने धर्म टिकविण्याचे व धर्म एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्याचे काम स्त्रियांनी केलेले दिसते.

### ब्राह्मणी परंपरा : वैदिक धर्म (Vedic Religion)

हा धर्म जगातील अतिप्राचीन व आद्य असा धर्म आहे. तो ऋषी-महर्षींनी, श्रुती,

स्मृती, पुराणे, इतिहास इत्यादी ग्रंथांतून आकाराला आणला आहे. मात्र हिंदू लोकांची शास्त्रे, या धर्माला आर्य धर्म, वैदिक धर्म, सनातन धर्म किंवा वर्णाश्रम धर्म या नावाने ओळखतात. वैदिक परंपरेचा आढावा घेतला तर वैदिक युगापासून मध्ययुगापर्यंतच्या काळात स्त्रीच्या स्थानामध्ये परिस्थितीनुसार परिवर्तने झालेली दिसून येतात. प्राचीन काळातील स्त्रीविषयक धार्मिक स्थानाबाबत वैदिक काळ, सूत्र-स्मृती काळ व पुराण काळ या संदर्भात अभ्यास करता येतो.

**१. वैदिक काळ** (Vedic Period) **(इ.स. पू. ८०० पर्यंत)** : या काळात शिक्षण, धर्म, दर्शन, वैयक्तिक उन्नती, सामाजिक जागृति या सर्व प्रांतांत स्त्रियांनी गौरवशाली कार्य केलेले दिसते. स्त्रियांनी पुरुषांप्रमाणे सर्व धार्मिक अधिकार व सवलतींचा उपभोग घेतला. त्यांना वैदिक शिक्षण मिळाल्याने त्या वैदिक मंत्र स्पष्टपणे म्हणू शकत होत्या. काही स्त्रिया विशेषकरून अविवाहित स्त्रिया स्वतःच यज्ञयाग करीत. विश्ववाराने सकाळी उठून एकट्यानेच यज्ञ सुरू केल्याचे उदाहरण मिळते.

वैदिक काळात मूर्तिपूजा किंवा मंदिरे नव्हती. भक्ती संप्रदाय अजून अस्तित्वात आला नव्हता. परिणामी, दैवी शक्तींची पूजा करण्याचा लोकप्रिय व प्रस्थापित मार्ग म्हणजे यज्ञयाग करणे हाच होता. तेव्हा या पद्धतीचा स्त्रियांसाठी निषेध करण्यात आला नव्हता. उपनयनानंतर दीक्षा घेतल्यावर त्या यज्ञयाग करू शकत.

वैदिक धर्मात स्त्रियांना संन्यास घेण्याऐवजी विवाहावर जोर देण्यात आला. त्यामुळे स्त्री ही धर्मकार्यातील अडथळा नसून धार्मिक विधी व कार्यात तिची उपस्थिती व सहकार्य आवश्यक ठरले. परिणामी, स्त्रीचे धार्मिक महत्त्व वाढले. स्त्रीशिवाय पुरुष हा आध्यात्मिकदृष्ट्या संपूर्ण होऊ शकत नसे. जीवनातील आध्यात्मिक कुशल क्षेमासाठी पुत्राची आवश्यकता असे. हा पुत्र पत्नीमार्फतच मिळू शकत असे. त्यामुळे स्त्रीलाही पतीप्रमाणे उच्च प्रतीचा धार्मिक दर्जा मिळत असे.

धार्मिक प्रार्थना व यज्ञयाग बहुतेक पती-पत्नी मिळून करत. त्यांनी संयुक्तपणे संपूर्ण आयुष्य पूजा-पाठ करण्यात घालविल्याचे उदाहरण आहे. पत्नी कुटुंबातील यज्ञयागात सक्रिय भाग घेत असे. पतीप्रमाणे पत्नीलाही यज्ञयागाच्या वेळी एक विशिष्ट उपनयन विधी करावा लागे. यज्ञयागाच्या आवारात तिची स्वतःची झोपडी असून यज्ञयागासाठी लागणाऱ्या दुधासाठी एक गायही असे. पूर्व वैदिक काळात सामगीत गाण्याची जबाबदारी स्त्रीची असे. नंतर हे कार्य विशिष्ट पुरोहित किंवा उद्‌गामी या वर्गाकडे देण्यात आले. यज्ञाच्या वेळी लागणारे तांदूळ कांडण्याचे, बळी दिल्या जाणाऱ्या पशूला स्नान घालण्याचे व आहुती देणे इत्यादी कार्ये तिला करावी लागत. म्हणजे यज्ञयागाच्या तयारीपासून, शेवटच्या विधीपर्यंतची तयारी पत्नीला करावी लागे. तेव्हा वैदिक काळातील यज्ञयागात स्त्रीचा सहभाग नावापुरता नसून वास्तविक होता. पतीप्रमाणे तिलाही खास धार्मिक हक्क मिळाले होते.

पती जर कामानिमित्त बाहेरगावी गेला असेल तर पती-पत्नीने मिळून करावयाचे विविध यज्ञकर्म पत्नी एकटीच पूर्ण करीत असे. काही असे यज्ञ होते की जे केवळ स्त्रियांकडूनच होत. यात - (१) सीता यज्ञ, (२) रुद्रबलि यज्ञ, (३) रुद्रयाग यज्ञ होत. पहिले दोन यज्ञ चांगले पीक व प्रजोत्पादनासाठी तर रुद्रयाग यज्ञामुळे अविवाहित मुलीला चांगले नशीब लाभण्यासाठी व जनावरांमध्ये समृद्धी व्हावी यासाठी केले जात.

प्रभू रामचंद्राचा युवराज म्हणून गादीवर बसण्याच्या वेळी कौसल्येने एकटीने स्वस्तियज्ञ पार पाडले होते. तसेच जेव्हा वाली व सुग्रीवचे युद्ध होणार होते त्या वेळी वालीची पत्नी तारा हिने स्वस्तियज्ञ केल्याचा उल्लेख आहे. कदाचित वाली युद्ध तयारीत व्यस्त असल्याने यज्ञाच्या वेळी उपस्थित राहू शकला नाही.

या काळात अनुलोम विवाह पद्धती (आंतरजातीय) अस्तित्वात होती. कनिष्ठ जातीतून आलेल्या पत्नीला धार्मिक कार्यात यज्ञकर्मात भाग घेण्याचा अधिकार होता. कनिष्ठ जातीची 'द्विजा' पत्नी आपल्या पतीची एकच पत्नी असेल तर तिला पूर्ण धार्मिक अधिकार देण्यात आले.

वैदिक काळात मुलांप्रमाणे मुलींनाही ब्रह्मचर्य व्रताचे पालन करणे आवश्यक होते. उपनयन सारखा सर्वाधिक धार्मिक संस्कार मुलींवर केला गेला नाही तर आपोआपच स्त्रियांना शूद्राचा दर्जा मिळत असे. मुलींचे सर्रास उपनयन होत असल्याने स्त्रिया-पुरुषांप्रमाणेच सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करीत. रामायणात सीता हे करत असल्याचा उल्लेख सापडतो. उपनिषदांच्या काळात स्त्रिया सभासंमेलनात शास्त्रार्थ करताना दिसतात. याज्ञवल्क्याची दुसरी पत्नी मैत्रेयी आपल्या पतीकडे संपत्तीचा वाटा न मागता आध्यात्मिक ज्ञानाचा वारसा मागते.

**२. सूत्र-स्मृती काळ** (Sutra-Smriti Period) **(इ.स. पू. ८०० ते इ.स. ३००)** : या काळात गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृती व इतर धर्मशास्त्रे रचली गेली. तसेच कौटिल्याचे अर्थशास्त्र, वात्स्यायनाचे कामसूत्र इत्यादी ग्रंथही लिहिले गेले. या सर्वांतून स्त्रीजीवनाचे चित्र पाहावयास मिळते.

या काळात हळूहळू स्त्रीच्या स्थानात परिवर्तन होऊ लागले. धार्मिक कृत्यापासून त्यांना दूर ठेवण्यात आले. मंत्रोच्चार करण्यास अयोग्य मानले जाऊ लागले. मंत्रांच्या उच्चारणातील एक चूकसुद्धा नरकात नेते असा समज पसरला. मुलींचा लवकर विवाह सुरू झाल्याने त्यांच्या धार्मिक अधिकारात व सवलतीतही उल्लेखनीय बदल झाले. त्यांचे ज्ञान संपादनाचे काम मागे पडत जाऊन त्यांचा 'द्विजा' किंवा Twice Born चा दर्जा समाप्त होऊन त्या शूद्र समजल्या गेल्या. इ.स.पू. दुसऱ्या शतकाच्या आसपास स्त्रियांचे स्थान व स्वातंत्र्य संकुचित बनू लागले. नारद स्मृतीमध्ये स्त्रियांच्या

कनिष्ठ दर्जाचा उल्लेख केला असून असे सांगितले आहे की, ''स्त्रियांनी नेहमीच दुसऱ्यांवर अवलंबून राहावे'' त्यामुळे स्त्रीचे पारतंत्र्य स्वरूप चांगलेच दिसू लागले. म्हणूनच ''कौमार्यात पित्याने, तारुण्यात पतीने व म्हातारपणात पुत्राने स्त्रीरक्षण करावे'' हा मनूचा विचार रूढ होत गेला. धर्मशास्त्रकारांनी चित्रित केलेली स्त्री आता पुरुषाच्या छायेखाली पूर्ण झाकाळून गेलेली दिसते. 'पतीसेवेतच यज्ञ केल्याचे समाधान मानावे व पातिव्रत्य हाच सर्वोत्तम धर्म होय' ही मनूची विचारसरणी मान्यता पावत चालली.

स्त्रियांनी करावयाचे यज्ञयाग समाप्त झाले. मनूने आपल्या संहितेत स्त्रियांच्या अधिकारांचा धिक्कार केला. स्त्रियांबाबत उपनयनाचा संस्कार आता होत नसे. परिणामी, त्यांना दिलेले धार्मिक अधिकार व खास सवलतींमध्ये कपात करण्यात आली. वैदिक यज्ञ करण्यास त्यांना असमर्थ मानले जाऊ लागले.

स्त्रियांवर यज्ञयागाबाबत प्रतिबंध लावण्याचे फारसे परिणाम झाले नाहीत. कारण हे यज्ञयाग लवकरच चलनातून समाप्त झाले. पण त्यामुळे स्त्रियांचे नुकसान होऊन त्या शूद्रांच्या दर्जाच्या झाल्याने यज्ञयागासाठी अपात्र ठरल्या. वेदाभ्यास व यज्ञयागातून स्त्रियांना हेतुपुरस्सररित्या वर्ज्य केले नव्हते. वैदिक गीतांच्या राखणदारांनी सांगितले की, वैदिक मंत्र नीट अभ्यासल्याशिवाय त्यांचे पठन होऊ नये. स्त्रियांचे लवकर विवाह झाल्याने त्यांना पठनासाठी योग्य वेळ मिळेनाशी झाली. परिणामी, अयोग्य पद्धतीने मंत्रोच्चार करून त्याचे वाईट परिणाम स्वीकारण्यापेक्षा त्यांना यज्ञयाग वर्ज्य करण्यात आले.

**३. पुराण काळ** (Puran Period) **(इ.स. ३०० ते इ. स. १८००)** : पुराणग्रंथांच्या आधारे स्त्री जीवनाची चर्चा करता येईल. वैदिक कर्ममार्ग पृष्ठभूमीत गेल्याने भक्ती व पौराणिक धर्माला महत्त्व प्राप्त झाले. पौराणिक धर्माने स्त्रियांना अनेक धार्मिक सवलती दिल्या. त्यामुळे स्त्रिया ह्या धर्माच्या अनुयायी व आश्रयदात्या झाल्या. या धर्माने स्त्रियांसाठी अनेक व्रतांचा उल्लेख केला. हे व्रत स्त्रियांमध्ये लोकप्रिय झाले व स्त्रिया त्याच्या खऱ्या राखणदार झाल्या. तथापि, इ.स. पूर्वी तिसऱ्या शतकात त्यांना व्रत-वैकल्ये करण्याची सवय होती. श्रुती-स्मृती काळात या गोष्टींचा विसर पडला. परंतु सम्राट अशोकाच्या शिलालेख क्र. ९ मध्ये याचा उल्लेख केला आहे. पौराणिक धर्म हा विश्वास व भक्तीवर आधारित होता. त्यामुळे तो स्त्रियांना अत्यंत आकर्षक वाटला. हिंदू स्त्रियांनी व्रत-वैकल्ये करून व पुराणातील कथा ऐकून त्या स्वभावाने भोळसर व भक्तिपूर्ण झाल्या. परिणामी, त्यांच्यात तर्कनिष्ठतेचा अभाव दिसून येतो.

एकूण समाजाचा दृष्टिकोण स्त्रियांबद्दल सहानुभूतीचा आणि आदराचा होता.

परकीयांच्या आक्रमणांना सुरुवात झाल्यानंतर या दृष्टिकोणात फरक पडू लागला. त्यांना घरातच राहावे लागले. परकीयांच्या आक्रमणात जबरीने धरून नेलेल्या, बाटवलेल्या स्त्रियांना इ.स.च्या ८ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत परत वैदिक समाजात घेतले जात असे. ८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून १२ व्या शतकापर्यंत अशा स्त्रियांना विकल्पाने वैदिक समाजात घेतले जात असे. पण इ.स. च्या १३ व्या शतकापासून हा दरवाजा स्त्रियांना कायमचा बंद झाला.

प्राचीन काळातील ब्राह्मण धर्मातील स्त्रियांच्या स्थितीवर दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसून येईल की, वैदिक उपनिषद काळात स्त्रियांना धार्मिक अधिकार होते. पतीबरोबर यज्ञकार्यात ती सक्रिय भाग घेत असे. परंतु सूत्र-स्मृती काळात स्त्रीचा दर्जा खालावला. ती परावलंबी झाली. तिचे धार्मिक अधिकार समाप्त झाले. पण पुराण-काळात स्त्री समाधानी श्रद्धायुक्त होती व म्हणून सुखी होती, असे मानले जात असे.

स्त्रियांमधील उत्साह, प्रामाणिकपणा व भक्तीमुळे जुनी धार्मिक पद्धती, नैतिक उत्साह व आध्यात्मिक परंपरा कायम राहिली असे मान्य करावे लागेल. ज्या स्त्रियांना धर्माने एके काळी वाळीत टाकले होते शेवटी त्यांनीच अडचणीत त्यास मदत केली. ब्राह्मण धर्माचा आत्मा व परंपरेच्या विश्वासू राखणदार स्त्रियाच होत्या !

## जैन धर्म व स्त्रिया

प्राचीन भारतात धर्मविषयक दोन प्रमुख विचारधारा दिसतात. एक विचारधारा ब्राह्मण वैदिक अगर हिंदू तर दुसरी विचारधारा श्रमण या नावाने ओळखली जाऊन जैन, बौद्ध इत्यादी त्याच्या शाखा आहेत.

जैन धर्माने स्त्रियांचे श्रेष्ठत्व लक्षात घेऊन त्यांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर तिला कुटुंबाचा प्रमुख घटक मानून कुटुंबामध्ये पुरुषापेक्षाही अधिक मानाचे स्थान दिले. संकटकाळात म्हणजे पूर, आग लागणे, दरोडा या प्रसंगी स्त्रीला सर्वांत आधी वाचविणे हे कर्तव्य महत्त्वाचे मानले जात असे. त्यामुळे जैन साहित्यातील जेवढ्या कथा आहेत त्यातील जवळ जवळ ८०-८५ टक्के कथा ह्या स्त्रीप्रमुख कथा असलेल्या दिसून येतात. इतर कोणत्याही धर्माच्या साहित्यापेक्षा जैन धर्मीय साहित्याने स्त्रियांचे श्रेष्ठत्व मांडण्याचा प्रयत्न केला.

प्रारंभीपासूनच जैनांनी आपल्या चोवीस तीर्थंकरांच्या पालकांना विशेषतः आईला अतिशय आदराचे स्थान दिले. बाल तीर्थंकरांना त्यांनी आपल्या मांडीवर घेतले आहे असे दाखविणारे दगडी काम केलेले चित्र दिसते. त्यांची जैन मंदिरात नित्य पूजा होत असे. आजही अबू, गिरनार, पाटण इत्यादी ठिकाणी ही पूजा होते.

जैन धर्माचे प्रथम तीर्थंकर वृषभनाथ यांची माता मरूदेवी मोक्षास गेल्याचा उल्लेख मिळतो. १९ वे तीर्थंकर मल्ली नावाची एक स्त्रीच होती असे श्वेतांबरपंथीय

मानतात. तर ब्राह्मी, सुंदरी, कमलावती, राजमती, रत्नावली, मदनलेखा इत्यादी अनेक स्त्रियांच्या प्रेरणेने बाहुबली, सतपथराज, तुलसीदास, रथनेमी इत्यादी अनेक पुरुष आपापल्या कर्तव्यामध्ये स्थिर झालेले दिसून येतात. महावीराची आई त्रिशलाने मथुरेतील जैनांची पूजा केली. जिने महावीरासारख्या तीर्थंकरांना जन्म दिला.

### भगवान महावीरांकडून स्त्रियांच्या श्रेष्ठत्वात वाढ

महावीरांच्या काळात शत्रू राजाच्या राज्यातील स्त्रियांचे अपहरण करून त्यांची खरेदी-विक्री केली जात असे. कोशंबीचा राजा दधिवाहन आपले कर्तव्य करीत नसल्याने शेजारचा राजा शतानिक त्याच्या नगरावर हल्ला करतो. तेव्हा स्वतःचा प्राण वाचविण्यासाठी दधिवाहन एकटाच पळून जातो. तेव्हा शतानिकाचा एक साधा शिपाई दधिवाहनाच्या राणीस व चंदना या मुलीस पकडतो. राणीस स्वतः पत्नी म्हणून ठेवतो व चंदना या नावाच्या मुलीची बाजारामध्ये नेऊन विक्री करतो. परंतु सुदैवाने महावीर आणि चंदनबालाची भेट घडून येते. त्यामुळे तिच्या जीवनाचे चित्रच बदलून जाते. कोणत्याही प्रकारचा विचार न करता चंदनबालास महावीर शिष्या म्हणून स्वीकारतात. विक्रीसाठी बाजारात उभी केलेली चंदनबाला पुढे साध्वी होते व अनाथ स्त्रियांना आधार देऊन त्यांचे जीवन सुखमय करते.

### स्त्रियांबाबतचा दृष्टिकोण

जैन धर्मात मुलगा व मुलगी यांच्याकडे समान दृष्टीने पाहण्यास सांगितलेले दिसून येते. कारण जैन तत्त्वज्ञानात स्त्री-पुरुष आत्मा समान मानला आहे. पुत्रजन्मोत्सवा-प्रमाणे कन्येच्या जन्माचे उत्सवही साजरे केल्याचे वर्णन प्राकृत जैन साहित्यात आढळते. कन्येचे योग्यप्रकारे संगोपन, शिक्षण, प्रौढ वयात विवाह संस्कार करणे, संपत्तीमध्ये मुलाच्या बरोबरीचे अधिकार देणे इत्यादी गृहप्रमुखाची कर्तव्ये मानली जातात. एवढेच नव्हे तर स्वतःच्या पतीची निवड करणे आणि अविवाहित राहण्याचे स्वातंत्र्यही तिला देण्यात आल्याचे दिसून येते.

जैन धर्मात एकही बालविवाहाचे उदाहरण दिसत नाही. उलट या पद्धतीची निंदा केल्याचे दिसते. विधवा स्त्रियांनाही सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार देण्यासाठी पुनर्विवाहाचेही स्वातंत्र्य दिल्याचे केवळ जैन धर्मात दिसून येते. सतिप्रथेसारख्या कुप्रथेची जैन धर्मात कठोर शब्दात निंदाच केलेली दिसून येते. त्यामुळे पतिनिधनानंतर एखादी स्त्री सती गेल्याचे एकही उदाहरण जैन धर्मात सापडत नाही. इतर समाजाप्रमाणे बहुपत्नीकत्वाची पद्धत जैन समाजातही दिसून येते. तरीही स्वतःच्या पत्नीशी मनाने, शरीराने, वचनाने एकनिष्ठ राहणारा श्रावकच जैन धर्माचा अनुयायी होण्यास पात्र असल्याचे दिसून येते.

जगातील अनेक संस्कृतींनी स्त्रियांच्या पडदा पद्धतीचे समर्थन केलेले दिसून येते.

परंतु जैन धर्माने स्त्रियांच्या पडदा पद्धतीचे कधीही समर्थन केले नाही किंवा पडदा पद्धतीच्या भिंतीत स्त्रियांना बंदिस्त केलेले दिसत नाही.

नगरामध्ये किंवा नगराबाहेर एखादा धार्मिक उत्सव, धर्म सभा आणि इतर प्रेक्षणीय प्रसंग असले तर प्रत्येक घरप्रमुख किंवा राजा आपल्या स्त्रिया परिवारासह किंवा स्त्रिया स्वतः एकट्याही त्यामध्ये सहभागी होत असलेली अनेक उदाहरणे जैन साहित्यात पाहावयास मिळतात.

**जैन साध्वी**

आदिनाथ ऋषभदेवांच्या संघात साधूपेक्षा आर्यिकांची संख्या जास्त होती. पार्श्वनाथांच्या संघात उत्कृष्ट अशा ३८,००० आर्या होत्या. अरिष्टनेमींच्या संघात ४०,००० आर्यिका होत्या. द्रौपदीने अरिष्टनेमींच्या संघातील सुव्रता आर्येजवळ साध्वी धर्माची दीक्षा घेतली. कृष्णाच्या पद्मावती, गौरी, गांधारी इत्यादी ८ राण्यांनी अरिष्टनेमींकडून दीक्षा घेतली. मल्लीच्या संघात ५५,००० आर्यिका होत्या, महावीरांच्या संघात ३६,००० साध्वी होत्या.

**दीक्षा घेण्याची कारणे**

जैन धर्मात साध्वी दीक्षा घेण्याचे प्रमाण फार मोठे होते. स्थानांग सूत्राच्या दहाव्या स्थानात दीक्षा घेण्याची ९ कारणे सांगितली आहेत.

१. **छंदा** : आपल्या अगर दुसऱ्याच्या इच्छेने घेतली जाणारी

२. **रोषा** : रागाच्या भरात

३. **परिधूना** : दारिद्र्यामुळे

४. **स्वप्ना** : स्वप्नाच्या निमित्ताने किंवा स्वप्नात

५. **प्रतिश्रुता** : प्रतिज्ञा निभावून नेण्यासाठी

६. **स्मरणिका** : रोगाच्या निमित्ताने

७. **अनादृता** : अनादर झाल्याने

८. **देवसंज्ञप्ती** : देवाच्या प्रतिबोधित होऊन

९. **वत्सानुबंधी** : पुत्राने केलेल्या तिरस्काराने घेतलेली दीक्षा

इहलोकाच्या, परलोकाच्या अगर उभयलोकांतील कल्याणासाठी दीक्षा घेतली जात असे. दीक्षा घेताना उच्च-नीच असा भेदभाव होत नसे. त्यात पद्मावतीसारखी महाराणी, पोट्टिलेसारखी सुवर्णकार कन्या व नंतर अमात्य पत्नी देवानंदेसारखी ब्राह्मणी व चंदनेसारखी बाजारात दासी म्हणून घेतलेली ही सर्व उदाहरणे बोलकी आहेत.

अनेक व्यक्तींच्या संदर्भात दीक्षेचा निषेध केलेला दिसतो. वृद्ध, व्याधिग्रस्त,

ऋणपीडित, गर्भवती, छोट्या बालकांच्या माता इत्यादींनी दीक्षा घेऊ नये असे प्रतिपादित केले आहे. तसेच आठ वर्षांपूर्वीही दीक्षाची परवानगी नव्हती. दीक्षेसाठी स्त्रीला पती अगर पित्याची अनुमती घ्यावी लागे.

**दीक्षा महोत्सव** : पुरुषाप्रमाणेच स्त्री दीक्षांच्या समयीही तशाच प्रकारचा उत्सव करीत असत. मल्ली, पद्मावती यांचेही उत्सव केले गेले.

**साध्वी आचार** : साध्वी आचारात पंचमहाव्रतांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. प्रत्येक साध्वीने त्यांचा स्वीकार केला पाहिजे. ही पंचमहाव्रते अशी आहेत.

१. **अहिंसा** : सर्व प्रकारच्या जीवांचा घात करणार नाही, दुसऱ्याकडून करविणार नाही.

२. **सत्य** : साध्वीने क्रोधाने, भयाने, लोभाने, हास्याने असत्य बोलू नये, दुसऱ्याला प्रेरणा देऊ नये.

३. **अस्तेय** : चोरी केलेल्या वस्तूचे ग्रहण न करणे.

४. **ब्रह्मचर्य** : अविवाहित राहणे.

५. **अपरिग्रह** : अल्प, जास्त, स्थूल, सूक्ष्म, सचित्र, अचित्र कोणत्याही प्रकारचा परिग्रह धारण करणार नाही.

## जैन धर्मातील श्राविका अथवा उपासिका

जैन धर्मातील स्त्रियांचे धार्मिक जीवन पाहत असताना धर्माचरण करणाऱ्या विविध प्रकारच्या स्त्रिया दिसून येतात. गृहस्थाश्रमात राहून जैन धर्माला बहुमोल आधार देणाऱ्या धर्मप्रवण अशा श्राविका अथवा उपासिकांचा उल्लेख सापडतो. त्यात जैनेतर ब्राह्मणी दिसतात, रेवा, मृगावती, जयंती, शिवनंदेसारख्या श्राविका, श्रमणोपासिका दिसतात व चंदना, सुव्रता, गोपालिका, पुष्पचूला यासारख्या साध्वी दिसतात. जैन धर्मावर, तत्त्वावर अथवा उपदेशांवर श्रद्धा अगर विश्वास असलेल्या स्त्रिया आढळतात. परंतु श्राविका धर्माची दीक्षा घेतल्याशिवाय त्यांना खऱ्या अर्थाने श्राविका अथवा श्रमणोपासिका हा दर्जा प्राप्त होत नसे.

श्रावकांच्या पत्नींनी पतीच्या सांगण्यावरून अगर धर्मोपदेशकामुळे प्रभावित होऊन श्रावकधर्म स्वीकारला असे दिसते. हे शिवनंदेच्या उदाहरणाने स्पष्ट होईल.

महावीरांच्या श्राविका संघात श्राविकांची संख्या श्रावकांहून तिप्पट होती. त्या धर्माच्या अतिशय जाणकार असत. त्या पतीचे हृदयपरिवर्तन करत किंवा संकटाच्या वेळी पतीला धीर देत. सुभद्रा, रेवती, सुलसा या श्राविका व्रतात दृढ होत्या. मरूदेवी मातेचे उदाहरण हे आदर्श श्राविकेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. गृहस्थावस्थेतच तिला निर्वाणप्राप्ती झाली.

जैन धर्मामध्ये गृहस्थ जीवनापेक्षा ब्रह्मचर्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. स्वाभाविकच स्त्री ही पुरुषाच्या अधःपाताला कारणीभूत असल्याच्या विविध कथा रचण्यात आल्या आहेत. परंतु पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही संन्यासाची परवानगी देण्यात आलेली आहे. स्त्रियांना मोक्षाचा अधिकार देण्याच्या बाबतीत मात्र जैनांमध्ये भेद आहेत. दिगंबरांच्या मते, स्त्रीला मोक्षाचा अधिकार नाही. ती पुरुष म्हणून पुनर्जन्म मिळाल्यावरच मोक्षाची अधिकारी होते. श्वेतांबरांना मात्र स्त्रीलाही मोक्षाचा अधिकार आहे असे वाटते. श्वेतांबरांच्या मते, मल्ली ही स्त्री १९ वी तीर्थंकर होती. दिगंबरांना अर्थातच या तीर्थंकरांचे स्त्रीत्व मान्य नाही. तीन वर्षे साधना केलेला श्रावक (पुरुष संन्यासी) हा तीस वर्षे साधना केलेल्या श्राविकेचा गुरू होऊ शकतो असे हे दोन्ही संप्रदाय मानतात. यावरून स्त्रीचे गौणत्व स्पष्ट होते.

## बौद्ध धर्म व स्त्रिया

गौतम बुद्धांचा संघ भिक्षु-भिक्षुणी, उपासक-उपासिका असा चतुर्विध होता. बौद्ध भिक्षुणींचे एकंदरीत आचार, आचरणाचे नियम, भिक्षुंच्या तुलनेत भिक्षुणींचे स्थान या सर्वांचे दर्शन विनयपिटक ग्रंथातून होते. थुल्लनंदा, चंडाकाली, सुंदरीनंदा, भद्दकापालिनी या शिष्या व छन्नग्गिया भिक्षुणी या प्रमुख भिक्षुणींचे जीवन व त्यांचा उपदेश, संवाद विनयपिटिकात आढळतात.

### साधने

बौद्धकालीन स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीबाबत माहिती देणारा पाली भाषेतील एकमेव ग्रंथ म्हणजे 'थेरीगाथा' होय. त्यात ५२२ कडवी असून अनेक तपस्विनींनी ते गायले आहे व त्यातून त्यांचा सर्वोच्च उद्देश 'निर्वाणा'ची प्राप्ती झाल्याने त्यांना मिळालेल्या आनंदाची अनुभूती स्पष्ट होते. या ग्रंथावर 'परमार्थ दिवाणी' या समालोचनात थेरी किंवा वृद्ध संन्यासिनींची चरित्रात्मक वर्णने असून त्यापैकी काही काल्पनिक स्वरूपाची आहेत असे सांगण्यात येते. तसेच 'मनोरथ पुराणी'मध्ये दिलेल्या यादीत ज्येष्ठ संन्यासिनी, श्राविका, उपासिका यांचे चरित्रात्मक वर्णन दिले आहे.

गौतम बुद्धांच्या काळात स्त्रियांची स्थिती पूर्वीपेक्षा फारशी बदलली नव्हती. तथापि, बुद्धांनी आपल्या शिकवणीत जे मूलभूत सिद्धांत मांडले त्यामुळे स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा झाली. ते सिद्धांत असे होते.

१. बुद्धाने सांगितले की, पुरुषाप्रमाणे स्त्रीला आपल्या गतकालीन कर्मांची फळे भोगावी लागतात आणि तिच्या भविष्यातील बरेवाईट किंवा मुक्तीसाठी तिला आपल्या कर्मावर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी तिला आई-वडील, शिक्षक किंवा आध्यात्मिक गुरू कोणीही मदत करू शकणार नाही.

२. बुद्धाने ब्राह्मण धर्मातील कर्मकांडाचा त्याग केला की, ज्यामध्ये स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान होते व वांझ व विधवांना कोणतेही स्थान नव्हते.

३. आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करण्याबाबत बुद्धाने स्त्री व पुरुषामध्ये भेद केला नाही. त्याने दोघांच्या फायद्यासाठी उपदेश केले. तसेच बुद्धाने केलेले नैतिक नियम दोघांना पाळावयाचे होते. परिणामी, आध्यात्मिक संस्कृतीच्या क्षेत्रात स्त्रियांना मिळालेला कनिष्ठ दर्जा समाप्त झाला. त्यामुळे अनेक संन्यासिनींचा उद्देश मोक्ष निर्वाण प्राप्त करणे हा होता.

४. संन्यासिनींचा दर्जा विवाहित, अविवाहित, वांझ किंवा विधवा या सर्वांसाठी खुला होता. स्त्रिया श्रमणी किंवा भिक्षुणी झाल्यावर त्यांच्या श्रेणीमध्ये कोणताही भेद राहत नसे. संघात केवळ आध्यात्मिक उन्नतीला महत्त्व दिले होते. एवढेच नव्हे तर वेश्येलाही संन्यासिनीचा दर्जा दिला जात असे. त्यानंतर तिच्या भूतकाळातील व्यवसायाबाबत तिचा निरादर केला जात नसे.

५. पुरुष संन्यासाप्रमाणे संन्यासिनी किंवा संन्यासिनीचे प्रशिक्षण घेणाऱ्या स्त्रीला शिक्षण दिले जात असे. अगदी सामान्य अशिक्षित स्त्रियांनाही बुद्धाच्या तत्त्वांचे प्रशिक्षण दिले जात असे. भिक्षुर्णींना मात्र अध्यात्माविषयक गूढ प्रश्न सोडविण्यासाठी तीव्र ध्यानात्मक अभ्यास करावा लागे. भिक्षुर्णींनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानातील गंभीर प्रश्नांचे विवेचन केल्याचे उदाहरण दिसते.

बुद्ध काळात स्त्रियांचा दर्जा उंचावला होता असा जरी दावा केला गेला तरी भिक्षुंपेक्षा भिक्षुर्णींचा दर्जा कमी होता हे मान्य करावे लागेल. स्त्रियांच्या शारीरिक कमकुवतपणामुळे कदाचित त्यांच्यावर काही बंधने घालण्यात आली असावी. तथापि, काही निर्बंधाचे समर्थन करता येत नाही.

हे निर्बंध (मर्यादा) खालीलप्रमाणे आहेत.

१. भिक्षुणी जरी १०० वर्षे त्या पर्यायात असली तरी नवदीक्षित साधूलाही तिने वंदन केले पाहिजे अशी बौद्ध धर्मातील प्रथा होती. या प्रथेचा महाप्रजापती राणी गौतमीने धिक्कार केला. परंतु तिला उपदेशकांच्या ठाम धोरणापुढे नमावे लागले.

२. पावसाळ्यात भिक्षु नसलेल्या ठिकाणी राहण्याची भिक्षुणीला परवानगी नव्हती.

३. पावसाळा संपल्यावर भिक्षुणीला आपल्या चुका (असल्यास) भिक्षु-भिक्षुर्णींपुढे कबूल कराव्या लागत.

४. पंधरवड्याच्या बैठकी (उपोस्था) आणि प्रबोधनाच्या (ओव्हाद) तारखा निश्चित करण्याबाबत भिक्षुंकडून योग्य त्या सूचना घ्याव्या लागत.

५. भिक्षुणीने एखाद्या नियमाचा बीमोड किंवा गुन्हा केला असल्यास दोन्ही संघांकडून (भिक्षु-भिक्षुणी) पापमोचन करावे लागे.

६. संन्यासिनीला अधिक मोठा दर्जा प्राप्त करण्यासाठी दोन्ही संघांकडून मंजुरी घ्यावी लागे.

७. संन्यासी एखाद्या संन्यासिनीला समज किंवा चेतावणी देऊ शकत असे पण संन्यासिंनी एखाद्या संन्यासाला असे करू शकत नसे.

८. संन्यासिनीने संन्यास्याची कधीही निंदा करू नये किंवा कठोर शब्द वापरू नयेत.

## बौद्ध उपासिका अगर श्राविका

बौद्ध व जैन धर्माच्या काळात प्राचीन भारतात श्रमण-श्रमणींना एकंदरीत अतिशय आदरपूर्वक वर्तणूक दिली जात असे. साधु-साध्वींच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याचे काम उपासक वर्ग आणि विशेषतः उपासिका करीत असत. बुद्ध घोषाच्या व्याख्येनुसार बुद्ध, धम्म व संघ यांना जो शरण गेला तो उपासक होय. हेच बौद्धधर्मीय उपासकांचे 'त्रिरत्न' होय. अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, सत्य व मद्यपानाचा त्याग या पंचशीलांचे पालन उपासक व उपासिका करीत असत. बौद्ध साहित्यात उपासिकांविषयीचे अनेक प्रसंग वर्णिले आहेत. गौतम बुद्ध स्वतः उपासिकांशी चर्चा करून त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यास मदत करीत. सुजातासारख्या अनेक जातक कथेत याचे उल्लेख सापडतात. सुजाता, विशाखा, खज्जुत्तरा, उत्तरा, नंदमाता, सुप्पवासा, कातियानी, नकुलमाता व काली या स्त्रियांचा 'आदर्श उपासिका' असा उल्लेख गौतम बुद्ध करतात. भिक्षा देण्याखेरीज उपासिका अन्य प्रकारे ही संघसेवा करीत. सुप्पिया उपासिका हर प्रकारे वैद्यकीय सेवा देत असे. गौतम बुद्धांनी उपासक-उपासिकांचा खूपच गौरव आपल्या उपदेशप्रसंगी केलेला आढळतो.

बुद्ध धर्माने स्त्रियांना धर्मोपदेशक म्हणून पेशा स्वीकारण्यास मोकळीक दिल्याने अनेक प्रतिभावान स्त्रिया त्याकडे आकर्षित झाल्या. त्यांनी स्वतःला चांगल्या शिक्षिका व धर्मोपदेशक म्हणून ख्याती मिळविली. अनेक शिलालेखांवरून अशी माहिती मिळते की ज्येष्ठ भिक्षुर्णींकडे महिला अनुयायी शिष्या होत्या. अनेक श्रीमंत स्त्री-वारसदार विवाहाकडे आकर्षित न होता नवीन धर्माच्या उपदेशकांच्या फौजेत भरती झाल्या. त्यात गुहा, अनुपमा व सुमेधा यांची नावे उल्लेखनीय असून त्या प्रसिद्ध नामवंत धर्मोपदेशक झाल्या. सम्राट अशोकची कन्या संघमित्रा सिलोनला बुद्ध धर्माच्या प्रसारासाठी गेली होती. कोशंबीचा राजा सहस्रनिकाची कन्या जयंती सुखसोई सोडून भाविक भिक्षुणी झाली.

गौतम बुद्धांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण संमिश्र होता असे म्हणता येईल. तरीही समकालीन समाजाचा विचार करता तुलनात्मकदृष्ट्या तो खूप उदार होता असे दिसून येते. स्त्रियांना भिक्षु संघात प्रवेश देण्यास ते तयार नव्हते. प्रत्यक्ष त्यांचे पालनपोषण

करणाऱ्या सावत्र आई गौतमी हिला त्यांनी प्रवेश नाकारला होता. तेव्हा महाप्रजापती गौतमी ५०० राजस्त्रियांसह मस्तक मुंडण करून कषाय वस्त्रे धारण करून कपिलवस्तू नगरातून वैशालीपर्यंत विहार करून गेली. परंतु आपला आवडता शिष्य आनंद याच्या आग्रहावरून त्यांनी स्त्रियांना प्रवेश द्यावयाचे कबूल केले. महाप्रजापती गौतमीच्या अध्यक्षतेखाली 'भिक्षुणी संघा'ची स्थापना केली. त्यांनी स्त्रियांना निर्वाणीचा म्हणजेच मोक्षाचा अधिकार असल्याचे मान्य केले होते. त्यांच्या या मताचा आधार घेऊनच आनंदाने त्यांच्याजवळ आग्रह धरून स्त्रियांना भिक्षुसंघात प्रवेश मिळवून दिला. याचा परिणाम म्हणूनच अनेक स्त्रिया कौटुंबिक जाचातून बाहेर पडण्यासाठी भिक्षुणी बनल्या. 'थेरीगाथा' या ग्रंथात अशा ७३ भिक्षुणींनी आपले अनुभव मांडले आहेत. बौद्ध धर्माच्या उदार वातावरणामुळेच हे शक्य झाले होते.

असे असले तरी गौतम बुद्धांनी स्त्रियांना भिक्षु संघात प्रवेश देताना व्यक्त केलेला अभिप्राय स्त्रियांचे गौणत्व दर्शविणारा आहे. "माझा धर्म आता एक हजार वर्षांऐवजी ५०० वर्षच टिकेल असे त्यांनी आनंदजवळ म्हटले होते." आम्रपाली नावाच्या गणिकेचे भोजनाचे निमंत्रण स्वीकारण्यात त्यांनी दाखविलेला विवेक मात्र गौरवास्पद आहे. आम्रपालीचे निमंत्रण नाकारून आपले निमंत्रण बुद्धांनी स्वीकारावे यासाठी लिच्छवी सरदारांनी आटापिटा केला. परंतु बुद्ध आम्रपालीकडे गेले.

आदर्श भार्येविषयीची बुद्धांची विचारसरणी मात्र परंपरागतच होती. त्यांनी भार्येचे ७ प्रकार सांगितले असून सहावा प्रकार सखी भार्या हा सर्वोत्तम असा तर सातवा प्रकार दासीभार्या हा असल्याचे सांगितले आहे. बौद्ध संघातील काही प्रथा स्त्रियांचे गौणत्व दर्शविणाऱ्या आहेत.

गौतम बुद्धांनी स्त्रियांवर जी विविध बंधने घातली ती प्रशिक्षण घेणाऱ्या उपासिकांसाठी होती. ज्या भिक्षुणींनी पावित्र्याच्या चार फलांपैकी एकाचीही प्राप्ती केली असेल त्यांच्यासाठी ती बंधने नव्हती. चार फल - ब्रह्मचर्य, काटेकोरपणा, कष्टसाध्यता, साधेपणा व मनाची शिस्त ही होत. त्यामुळे भिक्षु-भिक्षुणींचे संघ हे बुद्धांसाठी काळजीचे विषय होते. परिणामी, भिक्षुणींसाठी कडक नियम केले गेले.

## इस्लाम आणि स्त्रिया

इस्लाम हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ शांतीच्या जगात प्रवेश करणे असा आहे. परमेश्वराला शरण जाणे, मानवमात्रावर प्रेम करणे व अहिंसा मार्गाने वागणे या गोष्टी शिकवितो तो इस्लाम असा त्याचा अर्थ आहे.

महंमद पैगंबरांचा जन्म इ. स. पू. ५७० साली झाला. त्यांनी हा धर्म स्वतःच्या बुद्धीने निर्माण केला नाही तर त्यांना या धर्माचे इलहाम (समाधिस्थितीत) दर्शन झाले.

तेव्हापासून लोक त्यांना पैगंबर, नबी व रसूल म्हणू लागले. महमदाच्याद्वारे ईश्वराने आपला पैगाम (संदेश) पृथ्वीवर पोहोचवला म्हणून महमदाला पैगंबर ही उपाधी मिळाली. नबी म्हणजे परम ज्ञानाची घोषणा करणारा. रसूल म्हणजे प्रेषित किंवा दूत, महंमद हा रसूल आहे. कारण त्याने परमेश्वर व मानव यांच्यामध्ये धर्मदूताचे काम केले आहे. महंमद हा अल्लाचा अखेरचा प्रेषित झाला. त्याने अरब देशात इस्लामची स्थापना केली. लवकरच हा धर्म जगातील एक प्रमुख ताकद झाला. महमदाने केलेल्या उपदेशांना 'कुराण शरीफ' व 'हदीस' नावाच्या धर्मग्रंथात संग्रहित केले आहे. अल्लाकडून महंमदाला मिळालेले सिद्धांत यात अंतर्भूत आहेत.

कुराणाचे एकंदरीत स्वरूप पाहता स्त्रियांच्या विविध हक्कांसंबंधी तेथे नियमावली केलेली दिसते. विवाह, घटस्फोट, वारसा हक्क व पडदा या चार मुद्द्यांसंबंधी कुराणात सविस्तर विचार केला आहे. त्या काळात अस्तित्वात असलेल्या कोणत्याही धर्मात  स्त्रियांच्या बाजूने एवढा विचार केलेला दिसत नाही.

ईश्वराचे (अल्ला) एकत्व व अंतिम निवाड्याचा दिवस (कयामत) ह्या दोन गोष्टी मुस्लीम धर्मात प्रमुख आहेत. स्त्री-पुरुष या सर्वांनाच निवाड्याला सामोरे जावयाचे आहे असे पैगंबर व त्यांची पत्नी उम्म सलमा यांच्यातील संवादावरून दिसते. याचाच अर्थ असा की मुस्लीम धर्मानुसार धार्मिकदृष्ट्या तरी स्त्री व पुरुष दोघे समान आहेत आणि स्त्रिया या धर्माच्या मार्गातील अडथळा आहेत असे मानीत नाही.

**विवाह**

कुराणानुसार पुरुष हा चार स्त्रियांशी लग्न (निकाह) करू शकतो. त्या पत्नी मुस्लीम, ख्रिश्चन अथवा गुलाम असल्या तरी चालते. विवाहाला कन्येची लागणारी संमती ही एक औपचारिक बाब असून विवाहाच्या वेळी पालकांची मर्जी सांभाळण्याची प्रथा मुस्लीम स्त्रीला गौणस्थानच प्राप्त करून देते. मुस्लीम स्त्रीला मात्र एकाच विवाहाला संमती होती व तो पती मुस्लीमच असावा अशी  अट होती. लग्न हे पवित्र बंधन नसून तो एक करार दिसतो. विवाह एक सकारात्मक कर्तव्य होते. त्या करारात स्त्री देखील अट घालू शकते. खाजगी खर्चासाठी रक्कम (मेहेर) मागू शकते. कुराणातील संदिग्ध संदर्भानुसार असे मानले की धर्माने गर्भपात व कुटुंब नियोजन याला संमती दिलेली नाही. एका स्त्रीला ७-८ मुले असणे स्वाभाविक आहे. पुत्र हा ईश्वराची कृपा असे समजले जात होते. पैगंबराच्या आगमनापूर्वी अरब लोक मुलगी जन्माला आली असता तिला ठार मारीत असत. पैगंबरामुळे ही प्रथा बंद पडली. त्याविषयीचे त्यांच्या जीवनातील एक प्रसिद्ध उदाहरण डॉ. आ. ह. साळुंखे असे सांगतात की, 'महंमद पैगंबर आपल्या मुलीशी खेळत असताना तेथे आलेल्या एका अरबाने 'ही कोणाची मुलगी ?' असे त्यांना विचारले. त्यांनी 'माझी मुलगी' असे

उत्तर दिले. त्यावर तो अरब म्हणाला ''ईश्वरशपथ मला अशा अनेक मुली होत्या मी त्या सर्वांना जिवंत पुरले कोणाशीही कधी खेळलो नाही' त्यावर पैगंबर त्याला म्हणाले 'मग तुम्ही दुर्दैवी आहात. तुम्ही मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ वरदानाला मुकला आहात.''

**बहुपत्नीकत्वाची पद्धत**

मुसलमान समाजामध्ये बहुपत्नीकत्वाची पद्धत आहे. त्यामुळे एकपत्नीकत्वाचा कायदा स्वीकारण्यास हा समाज तयार नाही. पण प्रत्यक्ष कुराणाचा दृष्टिकोण काळजीपूर्वक पाहिला तर कुराण बहुपत्नीकत्वाच्या पद्धतीला फारसे अनुकूल नाही हे स्पष्ट आहे. कुराणामध्ये बहुपत्नीकत्वाला संमती देण्याचा फक्त एक निर्देश आहे. ''एका युद्धामध्ये अनेक पुरुष मरण पावले होते. मृतांची मुले पोरकी झाली होती. अशा परिस्थितीत पुढील अर्थाचा आदेश देण्यात आला होता.'' पोरक्या मुलांशी आपण न्यायाने वागू शकणार नाही अशी भीती तुम्हाला वाटत असेल तर तुम्हाला चांगल्या वाटणाऱ्या दोन, तीन वा चार स्त्रियांशी तुम्ही लग्न करा. परंतु या सर्वांना न्यायाने वागवणे जमणार नाही अशी भीती तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही फक्त एकाच स्त्रीशी लग्न करा.''

या निर्देशाकडे बारकाईने पाहिले असता हे स्पष्ट होईल की येथे एका अडचणीच्या परिस्थितीमध्ये म्हणजेच आपद्धर्म म्हणून बहुपत्नीकत्वाची केवळ परवानगी देण्यात आली आहे. ती देत असतानाही सर्व स्त्रियांना समान रीतीने वागवण्याचे बंधन घातले आहे. परंतु व्यवहारात मात्र सर्वांना समान रीतीने वागवणे आवश्यक असल्याची जाणीव करून देऊन एकाच स्त्रीशी लग्न करावे असेही सांगितले आहे. कुराणात अन्यत्र ही 'तुमच्यापैकी जे एकटे (अविवाहित) असतील त्यांनी लग्न करावे' असा आदेश आहे.

**घटस्फोट (तलाक)**

कुराणात घटस्फोटासंबंधी नाराजीचा सूर दिसतो. पुरुषाचा पुढाकार असेल तर तो 'तलाक' व स्त्रीचा पुढाकार असेल तर तो 'खुल' आहे. पुरुषाने टाकून देणे, मारहाण करणे, तो वेडा अथवा नपुंसक असणे अशा कारणांसाठी स्त्री घटस्फोटात पुढाकार घेऊ शकते. तलाक या शब्दाचा अर्थ मुक्त करणे वा गाठ सोडणे. कुराणाने विशिष्ट परिस्थितीत तलाकला संमती दिली. तलाक हा कायदेशीर असूनही ईश्वरला अप्रिय आहे. तलाकमुळे ईश्वराच्या सिंहासनाला हादरे बसतात असे मानले जाते.

कुराणात निर्णायक तलाक घेण्यापूर्वी पती-पत्नीस तीन महिन्यांचा अवधी दिला आहे. या काळात दोघांनी नीट सल्लामसलत करून आपल्या संबंधाचा पुनर्विचार केला पाहिजे. या पद्धतीला 'इद्दत' असे म्हणण्यात आले. एवढे करूनही त्यांचे परस्पर पटले नाहीतर शेवटी तलाक होत असे.

एकाच वेळी तीनदा 'तलाक' असे म्हणून तलाक देण्याची सध्याची पद्धत ही कुराणात संमत नाही. अशा प्रकारे देण्यात आलेला तलाक पैगंबराने रद्द ठरविला असा उल्लेख सापडतो. रजिया पटेल म्हणतात, ''एकतर्फी तोंडी तलाक देण्याची पद्धत मुस्लीम राष्ट्रांत नाही. तलाक देण्यापूर्वी पत्नीची संमती आणि धर्म न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते पण भारतासारख्या धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्रांतदेखील तोंडी तलाक ग्राह्य धरला जातो ही दुर्दैवाची बाब आहे.'' तोंडी तलाक देण्याची प्रथा हे पुरुषाच्या हातातील स्त्रीच्या शोषणाचे साधनच ठरत असल्यामुळे या प्रथेला कायद्याने बंदी घालणे आवश्यक असून स्वतः मुसलमान समाजानेच अशा प्रकारची मागणीची गरज आहे.

**संपत्ती**

मुस्लीम स्त्रीला संपत्ती बाळगण्याचा अधिकार आहे. पुरुष हा दोन स्त्रियांच्या बरोबरीचा आहे. त्यामुळे स्त्रीची संपत्ती पुरुषाच्या अर्धी असावी असे म्हटले आहे.

**पडदा पद्धती (बुरखा)**

कुराणात असे म्हटले आहे की, 'स्त्रीने समाजात उघड्याने फिरू नये. तो अविनय समजला जातो.' यातूनच बुरखा अगर गोषाची पद्धती उद्‌भवली व दृढमूल झाली. भारतात व खास करून शहरी भागात 'पडदा पाळणे' ही उच्च व मध्यमवर्गीय स्त्रियांपुरतीच मर्यादित अशी पद्धत होती. तसेच कामगार वर्गात आपला सामाजिक दर्जा उंचावण्याची ग्वाही देणारे ते एक प्रतिष्ठा प्रतीक मानले जाते.

**काझी**

स्त्रीला इस्लामची अनुयायी म्हणून पुरुषाबरोबर समानतेचे स्थान असले तरी तिला काझी बनण्याची मनाई आहे. तसेच स्त्रियांनी मशिदीत जाऊन नमाज पढण्यास कुराणात हरकत घेतली आहे. धर्माच्या औपचारिक संघटनेत व मुस्लीम समाजाच्या कायदेकानूबाबतच्या घडामोडीत तिला स्थान नाही. तिला 'काझी' बनता येत नाही.

धर्म हा पतीला कुटुंबप्रमुख मानतो आणि पत्नीने पतीच्या आज्ञेत राहून त्याची सेवा करावी अशी अपेक्षा बाळगतो.

हिंदू, ख्रिस्ती इत्यादी समाजांमध्ये स्वतःच्या धर्मशास्त्राचीही नवीन मूल्यांच्या आधारे चिकित्सा केली पाहिजे हा विचार आधुनिक काळात चांगलाच रुजला आहे. मुसलमान समाजात अशा प्रकारच्या विचाराने अजून मूळ धरलेले नाही. अर्थात, अशा प्रकारची चिकित्सा करण्यासाठी त्या समाजातून लोक पुढे आले पाहिजेत. कुराणाच्या आधारे स्त्री-पुरुष संबंध विषयीचे नियम केले तर मुस्लीम स्त्रीला सध्यापेक्षा अधिक न्याय मिळेल. बहुपत्नीकत्व, तलाक, बुरख्याची पद्धत इत्यादी बाबतीत कुराणाचे नियम सध्याच्या प्रथांपेक्षा स्त्रीला अधिक अनुकूल आहेत. याचा अर्थ असा

व्यवहारात कुराणाचे आदेश बाजूला ठेवून उत्तरकालीन रूढींच्या आधारे निर्णय घेतात. या रूढी स्त्रियांच्या दृष्टीने जाचक आहेत.

वस्तुतः स्त्रियांच्या हक्कांची नियमावली करणारा हा धर्म स्त्रियांच्या बाजूने विचार करणारा दिसतो. कट्टरता, धर्मांधता यामुळे मुस्लीम स्त्रियांमध्ये आजही मोठ्या प्रमाणावर मागासलेपणा दिसतो. भारतातील मुस्लीम स्त्री ही जशी मुसलमान आहे तशी ती भारतीय आहे आणि भारतीय संविधानाने स्वीकारलेल्या लोकशाही पद्धतीत इतर भारतीय स्त्रियांप्रमाणे तिलाही हक्क मिळावे ही मागणी वाढत आहे.

## शीख धर्म व स्त्रियांचे स्थान

जगातील सर्व धर्मांमध्ये तरुण असलेल्या शीख धर्माची स्थापना गुरुनानक (१४६९-१५३९) यांनी केली. 'शीख' याचा अर्थ शिष्य असा आहे. गुरुनानकांचे जे शिष्य आहेत त्यांना शीख म्हटले जाते. पंजाबी भाषेत त्यांना सिख्ख म्हणतात. हा पंथ गुरुमत पंथ आहे. गुरुनानकांपासून ते गुरू गोविंदसिंगांपर्यंत दहा गुरू झाले. त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणारा जो पंथ तो शीख पंथ समजायला हरकत नाही. (भारतीय संस्कृती कोश, नववा खंड, पृ. ३८४) गुरुनानक यांनी शीख धर्माच्या स्थापनेपासूनच त्यास ज्ञानवर्धक, साधा, व्यवहारी, पुरोगामी, आदर्शपूर्ण व दयाळू असे स्वरूप दिले. १५ व्या शतकातील भारतातील रूढीवाद, धर्मवेडेपणा, धर्मांधता व अंधश्रद्धा यांचा त्याग केला. शीख धर्माने स्त्रियांच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारले. श्री गुरुग्रंथसाहेब या पवित्र ग्रंथात स्त्री-जातीच्या हक्कांचा भरपूर उल्लेख केला आहे.

गुरुनानक यांनी स्त्रियांना न्याय देण्याबाबत आवाज उठविला व त्यांना पुरुषांप्रमाणे समानतेचा दर्जा देण्याबाबत धर्माचा आधार दिला. अशा प्रकारची समानता भारतातील इतर धर्मांमध्ये दिसत नाही. त्यांनी १५ व्या शतकात स्त्रीमुक्तीसाठी धडपड केली. अशा प्रकारची स्त्रीमुक्ती चळवळ युरोपात १८ व्या व १९ व्या शतकात सुरू झाली. आपल्या धार्मिक प्रवचनात गुरू नेहमीच स्त्रियांबाबत प्रशंसोद्गार काढीत.

"स्त्रीपासून आपला जन्म झाला, तिच्या गर्भातून आपल्याला आकार मिळाला. स्त्रीशी आपला वाङ्निश्चय झाला. तिच्याशी विवाह झाला. स्त्री आपली मैत्रीण आहे, तिच्यामुळे आपले कुटुंब आहे. जर एका पत्नीचा मृत्यू झाला तर आपण दुसरी शोधतो. स्त्रीमुळे जगातील मैत्रीसंबंध आहे, राज्यकर्त्यांना जन्म देणाऱ्यांना वाईट का म्हटले जावे ? स्त्रीमुळे स्त्री आहे. स्त्रीशिवाय कुणीही नाही." (गुरुग्रंथसाहेब - ४७३)

शीख गुरूंनी स्त्रियांना दुय्यम दर्जा देणाऱ्या सर्व निर्बंधांचा व नियमांचा निषेध केला. स्त्रिया अपवित्र आहेत. पापाचे मूळ आहे असा गैरसमजही दूर केला. स्त्रिया या समाजात सद्भावना, सर्वसामान्य सुख व सामूहिक नीतिमूल्यांचा प्रसार करण्यास

पुरुषांप्रमाणे सक्रिय कार्य करतात अशा प्रकारची घोषणा करून गुरुनानक यांनी स्त्रियांना आदरणीय दर्जा दिला.

शीख धर्माच्या मूळ तत्त्वज्ञानाप्रमाणे स्त्रीला पूजाअर्चा करण्याचे, शिक्षणाचे व व्यवसाय करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. ती शेतात, कारखान्यात काम करू शकते किंवा एक शिपाई म्हणून ती रणांगणातही जाऊ शकते. तिच्या मार्गात कुठल्याही प्रकारे अडथळे येत नाहीत. शीख धर्म हा कौटुंबिक धर्म आहे. त्यात संन्यास, वैराग्य याला स्थान नाही. वैराग्यांच्या ढोंगीपणावर शीख गुरूंनी टीका केली. विवाह ही स्त्री-पुरुषाला पवित्र बंधनात बांधणारी एक पवित्र संस्था आहे असे गुरुनानक यांनी मान्य केले. त्यांच्या मते, ''कुटुंबात राहूनच मुक्ती मिळते''. (गुरुग्रंथसाहेब, पृ. ६६१) सर्व गुरू विवाहित होते. शीख पुरुषांनी आपल्या पत्नीच्या प्रति एकनिष्ठ राहण्याचा आदेश देऊन दुसऱ्या स्त्रियांना माता किंवा बहीण या नात्याने बघण्याचा आदेश दिला. (भाई गुरुदास यांचा अहवाल, अमृतसर, १९७७)

शीख धर्मात स्त्री-पुरुषांच्या धार्मिक व सामाजिक समानतेसाठी व्यापक व व्यवहारी पावले उचलली. गुरुनानक यांनी संगत किंवा धर्मसभेची संकल्पना मांडली. त्यात स्त्री-पुरुषांनी जलशात एकत्र बसून कीर्तनाच्या कार्यक्रमात भाग घेतला पाहिजे. तसेच 'लंगर' (सामुदायिक भोजन) मध्ये जाती व सामाजिक दर्जाचा भेद न करता सर्वांना समान प्रवेश दिला. आवश्यक कामात समानरित्या भाग घेतला. उदा. विहिरीतून पाणी काढणे, पीक काढणे, स्वयंपाकघरात स्वयंपाक करणे, ताट स्वच्छ करणे इ. होत.

शीख धर्माने स्त्रियांना 'मुक्ती' प्राप्त करण्यापासून वंचित केले नाही. 'मुक्ती' प्राप्त करण्यासाठी तिला प्रथम 'पुरुष' म्हणून जन्म घ्यावा लागणार नाही तर ती स्त्री या नात्यानेच सर्वोच्च धार्मिक ध्येय प्राप्त करू शकते. तिला धर्मग्रंथ वाचण्यापासून देखील वंचित केले नाही. ती पुजारीण म्हणून देखील काम करू शकते. धार्मिक पूजा घेऊ शकते व गुरुद्वारामध्ये प्रार्थनेत पुढाकार घेऊ शकते. ती धर्मसभेत कोणत्याही निर्बंधाशिवाय हजर राहू शकते. ती शीख धर्माची दीक्षा घेऊ शकते वा देऊ शकते. ती समान धार्मिक हक्कांचा उपभोग घेते. गुरू अमरदास यांनी स्त्रियांमधील पडदा पद्धती समाप्त केली. त्यांनी हरिपूरच्या राणीला पडदा घेऊन अशा एका धर्मसभेत बसण्यास नकार दिला. गुरूंच्या मते, ''समाजात स्त्रियांना दास्यत्वात ठेवण्याचे एक प्रभावी साधन म्हणून पडदा पद्धतीचा आविष्कार झाला. त्यामुळे त्यांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण झाले व त्यांना घरातील चार भिंतींमध्ये राहावे लागले.''

गुरू अमरदास यांनी शीख धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी २२ प्रशासकीय विभाग स्थापन केले. त्यास 'मंजिस' असे म्हणण्यात आले. त्यापैकी चार विभागांच्या

प्रमुख स्त्रिया होत्या. त्या काळातील ही एक वैशिष्ट्यपूर्ण बाब होती. त्यांचा दर्जा आधुनिक बिशपप्रमाणे होता. कारण त्यांना त्यांच्या विभागात पूर्ण आर्थिक व निर्णय घेण्याचा अधिकार होता. अशा प्रकारे १६ व्या शतकाच्या उत्तरार्धात शीख धर्मात चार स्त्रिया बिशप (धर्मगुरू) होत्या.

तसेच गुरूंनी गुरुनानक यांचा संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्त्रियांना धर्मप्रसारक म्हणून प्रशिक्षित केले. त्यात १४६ लोकांमध्ये ५२ स्त्रिया होत्या. एकेकाळी अफगाणिस्तान व काश्मीरमधील धार्मिक स्थळेही स्त्रियांच्या अखत्याराखाली होती. धार्मिक मार्गदर्शनाव्यतिरिक्त या मिशनरी स्त्रियांनी खेड्यातील जनतेला विशेषतः स्त्रियांना शिक्षित करण्याचेही कार्य केले. गुरुजींनी स्थापन केलेल्या Perheas (संघटना) मध्ये स्त्रियांना पूर्ण धार्मिक अधिकार होते.

सन १६९९ मध्ये 'बैसाखी' (वैशाखातील पहिला सुगीचा दिवस)च्या दिवशी गुरू गोविंदसिंग यांनी 'खालसा' या (सर्वोच्च शिष्य) धर्मपंथाची स्थापना केली. त्याचा उद्देश गुरूंच्या अनुयायांमध्ये नवीन चैतन्य व आत्मविश्वास निर्माण करणे असा होता. स्त्रिया या पंथाच्या अविभाज्य अंग होत्या. त्यांना कुठल्याही भेदभावाशिवाय खालसा पंथात दीक्षा देण्यात आली. या प्रसंगी पवित्र पाणी 'अमृत' हे दीक्षा घेणाऱ्यावर शिंपडण्यात येते. हे अमृत तयार करण्याचे कार्य गुरू गोविंदसिंग यांची पत्नी माता साहिब कौर या स्त्रीनेच केले होते. हा एक आगळा-वेगळा उच्च सन्मान त्यांना दिला गेला होता. कारण इतर धर्मांत स्त्रियांच्या धार्मिक कार्यातील सहभागाला अत्यंत तुच्छ व तिरस्कारणीय मानले जात होते.

अमृत घेताना पुरुषांना 'सिंग' (सिंह) व स्त्रियांना त्यांच्या नावापुढे 'कौर' (राजकन्या) असे नाव देण्यात आले. कौर हे नाव अत्यंत महत्त्वाचे ठरले. कारण त्यामुळे स्त्रीला एक व्यक्ती म्हणून मान्यता मिळाली. विवाहानंतर तिने पतीचे नाव लिहिण्याची गरज नव्हती. जन्मापासून मृत्यूपर्यंत 'कौर' हा शब्द ती वापरू शकत होती. 'कौर' हा शब्द 'कनवर' (राजपुत्र) या शब्दापासून तयार झालेला आहे. शीख धर्माने स्त्रियांबाबतच्या जुन्या रूढी, परंपरांचा निषेध केला. त्यात सती, बालहत्या, पडदा पद्धती आहेत तर स्त्री शिक्षण, विधवा विवाहाचा पुरस्कार केला.

स्त्रियांच्या उद्धारासाठी शीख गुरूंनी एका अभिनव पद्धतीचा अवलंब केला. त्यांनी धर्मग्रंथात व दैनंदिन जीवनात स्त्रीलिंगी उद्‌बोधन भरपूर प्रमाणात केले. त्यांनी माहिती देण्याचे साधन म्हणून काव्याचा वापर केला. गुरूंचे काव्यात्मक उच्चार हे 'गुरू वाक्' हे पुल्लिंग न घेता 'गुरुबाणी' हे स्त्रीलिंगी घेतले. चौथे गुरू रामदास यांनी म्हटले, ''बानी गुरू गुरू है बानी, विच बानी अमृत सारे'' म्हणजे बानी गुरू आहे व गुरू बानी आहे आणि गुरुवाणीमध्येच सर्व अमृत आहे. (गुरुग्रंथ साहिबजी, पृ. ९८२)

विभिन्न धर्मांत ईश्वराला पिता म्हणून संबोधित केले आहे. तथापि, शीख धर्माने धर्माची संकल्पना माता व पिता या रूपात केली. पाचवे गुरू अर्जनदेव यांनी पहिल्या गुरूंनी स्त्रियांना दिलेल्या उच्च दर्जाला आणखी शक्तिशाली करण्यासाठी ईश्वराला दिलेल्या पित्याच्या नावापुढे मातेचेही नाव दिले. ईश्वर हा आपला पिता तसेच माताही आहे.

"Thou O Lord, art my mother and Thou my Father,

Thou art the Giver of Peace to my soul and very life.'

तसेच दैवी प्रकाशाला 'चनाना' असे न म्हणता स्त्रीलिंगी 'ज्योती' या शब्दाचा वापर केला.

गुरुनानक यांनी स्त्रिया या बौद्धिक दृष्टीने पुरुषांच्या बरोबरीने असून त्यांच्यात खोल अंर्तदृष्टी व आध्यात्मिक ज्ञानाची पूर्ण समज असते असे ठामपणे सांगितले.

गुरुनानकची मोठी बहीण बीबी नानकी या याबाबतचे उत्कृष्ट उदाहरण आहे. गुरूवर त्यांचा प्रभाव असून त्यांना गुरू आपला सल्लागार मानीत. बीबीलाही तिच्या भावाच्या सिद्धांतामध्ये विश्वास असून गुरूंच्या कार्यात नेहमी प्रोत्साहन देत असे. शीख धर्माची दीक्षा  घेणारी ती प्रथम स्त्री ठरली. गुरुनानक यांची आई तृप्तीने गुरुनानक यांस जीवन ध्येयाला प्राप्त करण्यास उत्तेजन दिले.

गुरू अंगददेवाची मुलगी बीबी अमरो एक विद्वान असून तिला गुरुनानक यांनी लिहिलेल्या 'शबद' स्त्रोतांची चांगली माहिती होती व ते 'शबद' ती मधुर स्वरात गात असे. तिच्या कीर्तनातून गुरुनानक यांच्या संदेशाचा प्रभाव इतका जबरदस्त होता की, गुरू अमरदासानी देवीची आराधना सोडून शीख धर्माचा स्वीकार केला.

माता थिवी ही गुरू अंगददेवाची पत्नी असून तिची महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे तिने 'लंगर'च्या संकल्पनेला प्रत्यक्षात आणले.

माता अजितकौरने पती गुरू गोविंदसिंगाच्या मृत्यूनंतर ४० वर्षे खालसा पंथाला मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. ती आध्यात्मिक व बुद्धिवादी असून तिने संकटकाळात शिखांना नेतृत्व दिले. गुरुपदासाठी असलेल्या खोट्या दावेदारांबाबत कडक पावले उचलली.

माता गुजरी ही आपला पती नववे गुरू तेगबहादूर व गुरू गोविंदसिंग यांच्यामागील प्रबोधक शक्ती होती. गुरू तेगबहादूराचे हौतात्म्य झाल्यानंतर तिने आपला मुलगा गुरू गोविंदसिंग यास मार्गदर्शन व उत्तेजन दिले. तिने गुरू गोविंदसिंगच्या चार मुलांना प्रशिक्षण दिले. या मुलांनी अगदी तरुणपणी शीख धर्मासाठी प्राणार्पण केले.

शीख धर्माने स्त्रियांना धार्मिक, सामाजिक व आर्थिक, राजकीय अधिकार दिले.

गुरुनानक यांनी मुक्या व आज्ञाधारक स्त्रियांबाबत सतत होणाऱ्या भेदभावाविरुद्ध प्रथम आवाज उठविला. तथापि, सर्व गुरूंच्या उपदेशानंतरही स्त्री ही शीख समाजात दुय्यम दर्जाचीच राहते. शीख हे भारतीय समाजाचे एक घटक असून हिंदू-संख्येचे चतुर्थांश-पंचमांश आहेत. १९५१ मध्ये हिंदूंची संख्या ८४.९ टक्के तर शिखांची संख्या १.७४ टक्के होती. त्यापुढील तीन जनगणनेत त्यांची संख्या हिंदूंच्या तुलनेत क्रमशः ८३.५-१.७९, ८२.७-१.८९, ८२.६- २ टक्के (शिरगणती १९५१ ते १९८१). शीख हे हिंदू व्यक्तिगत कायद्याद्वारा शासित केले जातात. शीख स्त्रियांनी हिंदू समाजातील काही दोष (कमजोर बाबी) घेतले. उदा. मुलाच्या जन्माबाबत पूर्वग्रह, बालकन्या हत्या, हुंडा पद्धती, बहुपत्नीकत्वाची पद्धती, पुरुष श्रेष्ठत्व इत्यादी. तेव्हा सिद्धांत व वास्तवतेत नेहमीच एक अंतर असते. शीख स्त्री अजूनही दुय्यम दर्जाची असून महत्त्वाच्या निर्णयांमध्ये पुरुषांच्या आज्ञेत राहते. तथापि, शीख स्त्रियांची स्थिती भारतातील इतर मुख्य धर्मातील स्त्रियांपेक्षा तुलनात्मकदृष्ट्या चांगली आहे.

## ख्रिस्ती धर्म व स्त्रियांचा दर्जा

येशू ख्रिस्त यांच्या नावाने प्रचलित झालेल्या धर्माला ख्रिस्ती धर्म ही संज्ञा प्राप्त झाली. येशू 'येथुआ'चे विकृत रूप असून त्याचा अर्थ मुक्तिदाता असा असून ज्यू धर्मात येशूला ईश्वर प्रेरित मुक्तिदाताची पदवी दिली आहे. येशू ख्रिस्ताचा धर्म म्हणून हा धर्म ओळखला जातो. ख्रिस्त हा शब्द ग्रीक भाषेतील 'ख्रिस्तोस' या शब्दावरून बनला असून त्याचा अर्थ अभिषिक्त असा आहे. हिब्रू भाषेत अभिषिक्त याला 'मसीहा' असे म्हणतात. स्वर्गातून पवित्र आत्म्याने येशूला अभिषेक केला अशी ख्रिस्तीजनांची धारणा व श्रद्धा आहे. अशा प्रकारे येशू ख्रिस्त पश्चिमेस प्रसिद्धीस आला. त्याचा जन्म २५ डिसेंबर इ.स. ४ मध्ये बेथलेहममध्ये एका गरीब ज्यू कुटुंबात झाला. त्याचा सर्व जगात अद्भुत प्रभाव पडला. ज्यू नेता मुसाने असे म्हटले होते, "जोहावे (ईश्वर) आपला प्रेषित पाठवेल जो सर्व जगाला धार्मिक उपदेश देऊन त्यांचे कल्याण करील."

येशू ख्रिस्त लहानपणापासून ईश्वरभक्तीमध्ये रुची घेऊ लागला. तो अंधविश्वासी लोकांना रागवीत असे. त्याचे हजारो अनुयायी झाले. पण त्याच्या उपदेशामुळे श्रीमंत व्यापाऱ्यांनी तक्रार केली की येशू त्यांची सत्ता समाप्त करण्यासाठी आला आहे. तेव्हा त्याला ३३ व्या वर्षी सुळावर चढविण्यात आले. येशूने मृत्यूनंतर ४० दिवसांपर्यंत आपल्या शिष्यांना दर्शन दिले. सुळावर चढविल्यानंतर तिसऱ्या दिवशी कबरीतून बाहेर निघाला.

येशू ख्रिस्ताचे उपदेश, नवीन धर्मप्रवचनात समावेश केले आहे, त्यालाच ख्रिस्ती धर्माचे पवित्र पुस्तक 'बायबल' असे म्हटले जाते.

ख्रिस्ती धर्मात एक मानव म्हणून स्त्री-पुरुष समान आहे की पुरुष तेथेही प्रधान असून स्त्री ही गौण आहे ? असा एक स्वाभाविक प्रश्न उठतो. ख्रिश्चन धर्माच्या प्रारंभीच्या काळात व मध्ययुगीन कालखंडातही पुरुष हाच कौटुंबिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत महत्त्वाचा मानलेला दिसतो. स्त्रीचे स्थान सतत दुय्यम राहिले. बायबलमध्ये प्रतिबिंबित झालेल्या विचारानुसार पुरुषाची प्रधानता ही स्वाभाविक नैसर्गिकच आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार हे ईश्वरइच्छेविरुद्ध पुकारलेले बंडच आहे. स्त्रीला असे स्थान देण्याने नैतिक व सामाजिक अध:पतन होते. स्वतः ईश्वर हा पुरुष असून तो जगाचा पिता आहे. कुटुंबातही पितृसत्ताक पद्धतीच योग्य आहे. पिता व पतीने आज्ञा करावयाची व कन्या तसेच पत्नीने तिचे पालन करावयाचे. स्त्री स्वतंत्रपणे काही करू लागली तर ते पाप आहे. स्त्रीने पापापासून स्वतःचा बचाव करावयाचा असेल तर दुय्यम भूमिका घेणेच हितावह ठरते. ख्रिस्ती धर्मात येशू ख्रिस्ताची आई मेरी हिचे अत्यंत आदराचे स्थान आहे. ती आज्ञाकारी होती. येशू ख्रिस्ताचा स्त्रीविषयक दृष्टिकोण अगदी समतेचा नसला तरी उदारतेचा होता. व्यभिचारी स्त्रीला दगडांनी ठेचून मारण्यासाठी लोक जमले असताना ''जो निष्पाप असेल त्यानेच पहिला दगड मारावा'' असे म्हणून येशू ख्रिस्ताने त्यांना परावृत्त केल्याची कथा प्रसिद्ध आहे.

ख्रिस्ती धर्मातील अत्यंत मूलभूत अशी आदम (ॲडम) व ईव्ह यांची पुराणकथा मात्र स्त्रीविषयक उदार दृष्टिकोणाला तडा देणारी आहे. ईश्वराने आपल्या प्रतिमेच्या स्वरूपात आदम या पुरुषाची निर्मिती केली असून पुरुष हे ईश्वराचे वैभव होय असे ही पुराणकथा सांगते. ईश्वराने आदमच्या बरगडीपासून ईव्ह या स्त्रीची निर्मिती केली. याचा अर्थ असा की, स्त्री त्याच्या एका सामान्य अवयवाच्या बरोबरीची आहे.

आदम आणि ईव्ह ईश्वराच्या नंदनवनात राहत होते. ज्ञानाचे फळ खाऊ नका असे ईश्वराने सांगितले होते. परंतु सैतानाच्या प्रभावामुळे ईव्हने ते फळ खाल्ले. अशा रीतीने मानवजातीमधील आद्य व पहिले पाप स्त्रीने केले. त्यामुळे ती अध:पतीत झाली. ती स्वतः तर अध:पतीत झालीच पण तिने ते फळ आदमला खाण्यास प्रवृत्त करून त्यालाही अध:पतीत केले. याचा अर्थ असा की, स्त्रीच्या अध:पतनाला स्त्री स्वतः कारणीभूत असून ती पुरुषाच्या अध:पातालाही कारणीभूत आहे. स्त्रीचे हे पहिले पाप मानवजातीमध्ये उतरत गेले आणि त्याचे प्रायश्चित्त घेण्यासाठी ईश्वराचा पुत्र असलेल्या येशू ख्रिस्ताला बलिदान करावे लागले. ईव्हने आज्ञेचे उल्लंघन केले म्हणून ती पापाला जन्म देणारी ठरली.

अत्यंत मूलभूत अशा या पुराणकथेमध्ये स्त्रीविषयी अनुदार दृष्टिकोण स्वीकारला असल्यामुळे पुढच्या काळात ख्रिस्ती संत वगैरेंनी भरपूर स्त्री निंदा करून घेतली आहे.

सदैव नांगी मारण्यासाठी सज्ज असलेला विंचू, सैतानाचे प्रवेशद्वार, गांधीलमाशीचे विष इत्यादी शब्दांत स्त्रीचे वर्णन करण्यात आले आहे.

काळाच्या ओघात प्रोटेस्टंट पंथियांनी या विचारात थोडी सुधारणा केली. त्यांनी असे मानले की स्वर्गात स्त्री व पुरुष समान होते. स्त्रीने केलेल्या अपराधाचे फळ म्हणून तिला दुय्यम स्थान मिळाले.

एक पत्नीतत्त्वावर ख्रिस्ती धर्माने जोर दिल्याने स्त्रीचा दर्जा उंचावण्यास मदत मिळाली. परंतु विवाह हे कायमचे बंधन असून घटस्फोटाला त्या ठिकाणी स्थान नसल्याने कॅथालिक पंथातील आणि इतर काही समूहांतील स्त्रियांच्या दर्जावर त्याचा विपरीत परिणाम झालेला दिसतो. ख्रिस्ती स्त्रियांना जरी आपल्या घरात संरक्षण आणि मुलांचा सहवास यांचा लाभ मिळत असला तरी कायदेशीर हक्क व स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार यापासून त्या वंचित आहेत. त्यामुळे अधिकतर प्रमाणावर पतीच्या अधिपत्याखाली राहावे लागते.

स्त्रीच्या ठायी काही गुण असले पाहिजेत या गोष्टीवर बायबलमध्ये भर दिला गेला आहे. त्यात तिची काम करण्याची क्षमता, कुटुंबाबद्दलची काळजी, दयाळूपणा, कुटुंबेतर व्यक्तीबद्दल तिला वाटणारी आस्था व औदार्य आणि बुद्धिमत्ता या गुणांना महत्त्व आहे. तिला सर्व धार्मिक समारंभात भाग घेता येतो. परंतु मॅथॉडिस्ट संप्रदायाचा अपवाद सोडल्यास चर्चच्या संघटनेत तिला पूर्ण जबाबदारीचे स्थान मिळालेले नाही. विवाह हेच स्त्रियांसाठी एकमेव ध्येय आहे असे ख्रिस्ती धर्म मानीत नाही. तिला व्यक्तिमत्त्व आहे तसेच समाजाच्या संदर्भातही तिची काही कर्तव्ये आहेत. या प्रदीर्घ परंपरेमुळे शिक्षण क्षेत्रात तसेच व्यावसायिक क्षेत्रात पारिचारिका, वैद्यकतज्ज्ञ व शिक्षिका म्हणून ख्रिस्ती स्त्रियांनीच सर्वप्रथम प्रवेश केला.

आध्यात्मिक क्षेत्रात स्त्रीचे स्थान दुय्यम दर्जाचे आहे. विल्यम पार्किन्सने इ.स. १५९६ मध्ये लिहून ठेवले आहे की, चेटूक, मंत्र-तंत्र करण्यात स्त्रियांचा नेहमी पुढाकार असतो. अशा वेळी सैतान स्त्रियांचा आश्रय घेतो. जॉन रॉजर्सने १७ व्या शतकाच्या प्रारंभी असा विचार मांडला की चर्चचा कारभार चालविण्यात स्त्रियांनी सक्रिय भाग घेतला पाहिजे. त्यानंतर 'क्वेकर मूव्हमेंट', 'प्यूरिटन मूव्हमेंट' अशा अनेक चळवळी विचारवंतांनी घडवून आणल्या. मागरिट फेल, ॲनी हॅनिसन अशा अनेक जणींनी स्त्रीच्या धार्मिक स्थानासाठी विचारमंथन केले. ॲन हिबेन्सवर तर 'चेटूक करणारी' असा खटला भरून तिला हद्दपार केले गेले. १८३० पासून या चळवळीला जोर आला. १९४८ साली स्त्रियांच्या हक्कांचा मसुदा पास झाला.

एकंदरीत सनातन ख्रिश्चन लोकांनी स्त्रियांना धर्म शिक्षण देण्यास बराच विरोध केला. मिशनमध्ये येऊन नन (Nun) म्हणून सेवा, धर्मप्रसार करण्यासाठी दीर्घकाळ झगडावे लागले.

## भक्ती चळवळ (Bhakti Movement)

१३ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक आंदोलन म्हणून भक्ती चळवळीचे प्रभुत्व भारतात राहिले. या कालखंडातील धार्मिक नेतृत्वाला मध्ययुगीन गूढवादी व धार्मिक क्रांतिकारी संत कवी-कवयित्रीचा कालखंड म्हणूनही संबोधले गेले आहे. ८ व्या शतकापासून सुरू झालेल्या मुस्लीम धार्मिक आक्रमण व धर्मांतराविरुद्ध समाज एकसंघ राहावा म्हणून भारतीय समाजात भक्ती चळवळीचा उदय, वाढ व विस्तार झाला.

स्वशोधासाठी चाललेल्या स्त्रीच्या संघर्षाचे आकलन होण्यासाठी मध्ययुगीन संत स्त्रियांचे वाङ्‌मय हा इतिहासातील महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागतो. स्त्री ही पुरुषाच्या आध्यात्मिक प्रगतीतील अडथळा मानली असताना संत स्त्रियांनी भक्तिमार्गाचा अवलंब करून आध्यात्मिक मोक्ष मिळविण्याची धडपड केली. हिंदू आध्यात्मिक परंपरेने कनिष्ठ जातीप्रमाणेच सर्व स्त्रियांनाही मोक्ष नाकारला होता. अशा कालखंडात स्त्रियांनी स्वतःचे असे धर्मांतर्गत स्थान मिळविले. शिक्षणाचा अधिकार नसतानाही धर्माच्या चौकटीत राहून उत्तम प्रतीच्या काव्याची निर्मिती केली. तर काही संतस्त्रिया पारंपरिक रूढिग्रस्त जातिधर्माच्या बंधनापलीकडे जाऊन भक्तिमार्ग चोखाळू शकल्या.

भारतातील मुस्लीम आक्रमणामुळे हिंदू धर्मांचे, शास्त्रांचे मूल्यांकन करण्यासाठी हिंदू समाज प्रवृत्त झाला. यामुळे विज्ञानेश्वर आणि जीमुतवाहन यांनी स्त्रीच्या वारसाहक्काबाबत भूमिका मांडल्या. सयाना व मधवा यांनी वेदांवर भाष्य केले. सेन के. एम. आपल्या 'Mysticism of India' या पुस्तकात म्हणतात, ''हे लिखाण संस्कृतमध्ये असल्याने वरिष्ठ वर्गातील लोकच वाचत असल्यामुळे सर्वसामान्यांवर त्याचा परिणाम झाला नाही.''

भक्ती चळवळीने हिंदू समाजाची रूढिप्रियता सैल करण्याचा प्रयत्न केला. कनिष्ठ जातीच्या लोकांकडे लक्ष दिले. मध्ययुगीन भारतात आर्थिक व लष्करी सरंजामशाही जीवनपद्धतीमुळे पितृसत्ताक पद्धतीचे वर्चस्व होते. खालच्या वर्गांबरोबरच स्त्रियांनाही दडपले-जाई. स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ होता. शिक्षण नव्हते. बालविवाह पद्धती रूढ होती. स्त्री पूर्णपणे माहेर किंवा सासर यांच्या बंधनात अडकली होती. पातिव्रत्याला महत्त्व होते. करंट्या विधवेचे जीवन जगण्यापेक्षा स्त्रिया सती जाणे पसंत करीत. मालमत्तेमध्ये हक्क नसल्याने स्त्रीजीवन पराधीन होते. अशा सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीतही स्त्रियांनी भक्ती चळवळीत आपले स्थान निर्माण केले. ज्या संतस्त्रियांचे मध्ययुगीन साहित्यातून उल्लेख मिळतात त्यामध्ये मीराबाईचे स्थान महत्त्वाचे आहे.


मीराबाई

**१. मीराबाई** : राजघराण्यात जन्मलेली मीरा उत्स्फूर्त, भक्तीप्रधान रचनेबद्दल प्रसिद्ध आहे. 'मीरा' या नावाबद्दल अनेक उपपत्ती सापडतात. 'मीर' या ऊर्दू शब्दापासून ते आले असे मानले जाते. 'मीर' म्हणजे अग्रणी, धाडसी. मीराबाई या शब्दाचा अर्थ ईश्वराची पत्नी असाही केला जातो. मीराबाईचे वडील राठोडचे राणा जयमल हे होते. एका युद्धात पितृछत्र हरवल्याने तिचा सांभाळ तिचे आजोबा मेरठचे राणा रावदुदा यांनी केला. ते स्वतः कृष्णभक्त होते व काव्यरचना करीत. त्यांच्या भजन, पूजनात सामान्य प्रजाही सामील होई. हेच गुण मीरेने उचलले होते. एका साधुजवळची सुंदर कृष्णमूर्ती लहानग्या मीरेने हट्टाने मागितली आणि ती तिची जन्मसखीच बनली. मीरेने आपले लग्न मनोमनी गिरीधर गोपालशी लावून घेतले. आजोबांनी मीरेला शिकवायला गदाधर नावाचे गुरू नेमले. त्यांच्यामुळे भारतीय तत्त्वज्ञान, समकालीन कवींच्या काव्यरचना यांचा परिचय तिला झाला. या संस्कारसमृद्धीमुळेच मीरेच्या काव्याला उत्कटता आली. राजस्थानी, ब्रीज, गुजराथी या तिन्ही भाषांवर तिचे प्रभुत्व होते. कर्नल टॉडच्या मते, आजोबांनी मेवाडचा राणा राणाकुंभ यांच्याशी इ.स. १४१३ मध्ये मीरेचे लग्न लावून दिले. ती राणासंगाची सून झाली. तिची कृष्णभक्तीतील तल्लीनता पाहून सासऱ्यांनी तिला गोपालमंदिर बांधून दिले. कृष्णभक्तीत रमलेल्या मीरेभोवती भक्तजनांचा मेळा जमू लागला. तिचा दीर विक्रमजीत व नणंद उदाबाई यांनी तिच्याबद्दल अनेक कटकारस्थाने रचली. विषाचा प्याला देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ती चुलत्याकडे गेली. तिथेही युद्धात पराभूत झालेला चुलता परागंदा झाला त्यामुळे ती तिथे राहू शकली नाही. तिने पदयात्रा सुरू केली. तिच्या भजन आणि गाण्यावर लुब्ध झालेले भक्त तिच्या पाठोपाठ जाऊ लागले. ती प्रथम वृंदावन व नंतर द्वारकेला गेली. जन्मभराच्या विरह-व्यथेने आणि पायी वाटचाल करून शीण झालेल्या मीरेने डाकोरच्या मंदिरात देह ठेवला.

मीरेने रयैदासाला आपले गुरू मानून दुहेरी सामाजिक क्रांती केली. एका स्त्रीने पुरुषाला आणि उच्चवर्णीय स्त्रीने दलिताला गुरू मानणे हे तत्कालीन स्थितीत लोकविलक्षण होते. तसेच कृष्णभक्तीत स्त्री-पुरुष भेदही ती मानत नसे. कृष्णभक्तीच्या उत्कटतेची प्रचिती म्हणजे मीरेच्या कविता. तिच्या आर्त, कोमल भावनेला नेमकेपणाने व्यक्त करणारी शब्दांची कोवळीक तिच्या काव्यात आहे. मन हेलावणारे काव्य जनमानसांवर आजही प्रभाव ठेवून आहे. उदा.

१. झुकि आई रे बदरीया सावन की,
हिलमिल मंगल गाया जी,
असुवन जल सींचि प्रेमबेल बोई,
अब तो बेली फुल गयी , तारो अब मोहि ॥

२. ''हरि मैं तो प्रेम दिवाणी, मेरा दरद न जाने कोई ।''

'राजगोविंदा' हे काव्य तिने रचले असून, जयदेवाच्या गीतगोविंदावर तिने एक टीका लिहिली आहे असे काही विद्वानांचे मत आहे. मेवाडमधील दोन कृष्णमंदिरांपैकी एक मीराबाईने व दुसरे राणाकुंभ याने बांधले आहे असे मानले जाते. भारतातील सर्वश्रेष्ठ स्त्री भक्तांपैकी ती एक होती. वल्लभ व चैतन्य भक्तिपंथीयांमध्ये तिची गणना होई. भारतीय भक्तिवाङ्मयात मीराबाईस मानाचे स्थान आहे. पदलालित्य, भावनोत्कटता, भक्ती हे तिच्या काव्यरचनेचे विशेष म्हणून सांगता येतील. कालांतराने तिच्या जीवनाविषयी अनेक दंतकथा गुंफल्या गेल्या आहेत.

**२. कबीरांच्या शिष्या :** मीराबाई इतक्या प्रसिद्धीस न आलेल्या महिलांमध्ये कबीरांची समकालीन 'क्षेमा' अगर 'क्षेमश्री' या नावाची एक गवळण होती. हिच्याशी आध्यात्मिक प्रश्नांची चर्चा करून कबीर समाधानी होई. कबीरांच्या काही शिष्यांपैकी त्याची मुलगी 'कमाली' व 'गंगुबाई' या उपासिका म्हणून इतिहासात ज्ञात आहेत.

**३. रामानंदाच्या शिष्या :** पीपा नावाच्या रामानंदाच्या शिष्याची पत्नी 'सीता' ही त्यांना गुरू मानी. उदारमतवादी विचारवंत म्हणून प्रसिद्ध असलेल्या दादूच्या दोन कन्या 'नानीबाई' आणि 'माताबाई' (१६०३-६०) या काळात प्रसिद्ध होत्या. चरणदासी पंथाचा संस्थापक चरणदास (१८ व्या शतकाचा मध्य) यांच्या शिष्यपरिवारात सहजोबाई हिने 'सहज-प्रकाश' आणि 'सोलह-तत्त्वनिर्णय' तर दयाबाई हिने 'दया-बोध' व 'विनय-मालिका' हे ग्रंथ लिहिले.

**४. महादाइसा ऊर्फ रूपाई :** मराठी वाङ्मयात ज्ञात असलेली पहिली मराठी कवयित्री म्हणून महदंबा म्हणजेस महादाइसा ही १३ व्या शतकात देवगिरीच्या यादवराजांच्या काळात होऊन गेली. ही वामनाचार्यांची नात होय. वैधव्यानंतर ती माहेरी राहिली. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर महाराष्ट्रात आले असता ती त्यांची शिष्या बनली. चक्रधर व महादाइसा या दोघांमध्ये झालेल्या प्रश्नोत्तरांचा समावेश तिने लिहिलेल्या 'इतिहास' आणि 'लीळाचरित्र' या ग्रंथात आहे. तिच्या या लेखनामुळेच चक्रधरांविषयी माहिती उपलब्ध झाली आहे. चक्रधरांबरोबर बद्रिकेदारच्या गोविंदप्रभू यांच्याकडे महादाइसा राहिली. चक्रधराच्या मृत्यूनंतर त्यांचा शिष्य व आपला चुलता नागदेव याकडे तिने उर्वरित आयुष्य घालविले. गुरू गोविंदप्रभूच्या

विवाहाच्या प्रसंगी गुरू चक्रधरांच्या प्रेरणेने तिने जे काव्य रचले तेच 'धवळे' या नावाने पुढे प्रसिद्धीस आले. ''मग धवळी गाईन गोविंदराणा'' अशी त्याची सुरुवात आहे. श्रीकृष्ण आणि रुक्मिणीच्या विवाहाचा कथाभाग उत्स्फूर्तपणे यातून गायला आहे. 'रुक्मिणी-स्वयंवर' हे काव्य तिने रचले. त्यातील प्रत्येक ओळीच्या सुरुवातीचे अक्षर देवनागरी लिपीच्या अनुषंगाने लिहिले आहे. तिच्या काव्यातून चक्रधरांचे स्त्रियांविषयीचे उल्लेख मिळतात. एका ब्राह्मणाच्या विधवा मुलींना 'पाचरांडा' म्हणून बोलवले जाई. चक्रधर मात्र त्यांना 'पंचगंगा' म्हणून बोलावित. ज्या काळात स्त्री ही मोक्षमार्गातील धोंड मानली जात असे. त्या काळात इंद्रिय जिंकणे फक्त पुरुषांचा मक्ता नसून स्त्रिया योगमार्गाने इंद्रिय जिंकू शकतात हे तिने दाखविले. तिने संन्यास मार्गाचा स्वीकार केला.

५. **मुक्ताबाई (१२७९ ते १२९७)** : वारकरी संप्रदायामध्ये मुक्ताबाईस वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, एकनाथ, नामदेव, तुकाराम' यांच्या नामावलीत मुक्ताबाई ही एकच स्त्री संत मिळते. वाळीत टाकलेल्या आपल्या भावंडांबरोबर मुक्ताबाईला अनेक दुःखे भोगावी लागली. ती एक सुविख्यात तत्त्वज्ञ, विदुषी, आध्यात्मिक गुरू म्हणून मोक्षमार्गाची दीक्षा देत असे. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात ती म्हणते, 'नुसते देवाच्या सान्निध्यात राहून देवत्व प्राप्त होत नाही, जरूर ते आध्यात्मिक पूर्णत्व प्राप्त झाल्यावरच मुक्ताबाईने नामदेवास वंदन केले. तापी नदीच्या तीरावरील चांगदेव वटेश्वरालाही तिने मार्गदर्शन केले. चांगदेवाच्या पुष्कळशा अभंगांत मुक्ताबाईचा गुरू म्हणून उल्लेख मिळतो. मुक्ताबाई ही प्रतिभासंपन्न कवयित्री होती. तिचे 'ताटीचे अभंग' प्रसिद्ध आहेत. 'जगाच्या असमंजस वर्तनाने चिडणे किंवा रागावणे खऱ्या संतांना शोभत नाही' असा आशय या अभंगात आहे. तिच्या अभंगातून असामान्यत्वाची साक्ष मिळते. ज्ञानेश्वरासारख्या बंधूच्या मोठेपणात भर घालण्यासाठी बौद्धिक कुवत व आध्यात्मिक पूर्णत्व मुक्ताबाईजवळ होते. वयाच्या १८ व्या वर्षी अंगावर वीज पडून तिचा अंत झाला. 'ताटीच्या अभंगा'त ती ज्ञानेश्वरास म्हणते,

''योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥१॥
विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥२॥
शब्दशास्त्रे झाले क्लेशा । संती मानावा उपदेश ॥३॥
विश्व-पट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा'' ॥४॥

६. **बहिणाबाई (१६२८ ते १७००)** : संत तुकारामाची शिष्या बहिणाबाई हे संत वाङ्मयातील एक गूढ व्यक्तिमत्त्व. विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी धडपडणारी एक बुद्धिमान, जागृत स्त्री, विविध विषयांवर अधिकार वाणी मिळविणारी,

प्रापंचिक असूनही विलक्षण योगसामर्थ्य असणारी स्त्री म्हणून बहिणाबाई एक महत्त्वपूर्ण संत कवयित्री मानली जाते. शिवकालीन कवयित्री म्हणून तिचे स्थान महत्त्वाचे आहे. बहिणाबाईने स्वतःची 'गाथा' लिहिली. तेच तिचे आत्मचरित्र. त्याचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात १-५३, दुसऱ्या विभागात ५४-७९ तर तिसऱ्या भागातील अभंग मृत्यूपूर्वीचे आहेत. तिच्या आत्मचरित्रात लिहिलेले महत्त्वपूर्ण वाक्य म्हणजे, "प्रपंच परमात्म करी समान, तिनेच गगन झेलियेले" बहिणाबाई ब्राह्मण पण तिचे गुरू तुकाराम जन्माने क्षुद्र म्हणून तिला तत्कालीन समाजाचा व कुटुंबाचा विरोध सहन करावा लागला. तुकारामाला गुरू मानल्याने तिला विरोध करणाऱ्या नवऱ्याला ती तुकारामांचे शिष्यत्व पत्करण्यास भाग पाडते. हेच तिच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होय. तिच्या काव्यरचनेमुळे भागवत धर्माची फडकती पताका होण्याचा मान तिला मिळतो. तिच्या काव्यातून स्त्रीविषयक अनेक जाणिवा स्पष्ट होतात.

"स्त्रीचे शरीर पराधीन देह । न चाले उपाव विरक्तीचा ।"

ही तिची वेदना आहे. शरीराचे भोग हे तिला वैऱ्यासारखे वाटतात. कारण तिला त्याची किळस वाटते. तिच्यापेक्षा २७ वर्षांनी मोठा असणारा नवरा. तापट, मारकुटा अशा नवऱ्याशी तिचे शारीरिक संबंध प्रेमाचे असतील असे म्हणता येणार नाही. म्हणूनच स्त्रीदेह परमार्थाच्या आड येतो हा तिचा स्वानुभव आहे. शरीरभोगातून निर्माण झालेले हे चक्र, त्याबद्दल तिला वाटणारी खंत हे तिच्या लिखाणातून स्पष्ट होते.

**७. जनाबाई** : जनाबाईचा जन्म परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथे झाला. विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपुरास आली असता ती नामदेवाचे वडील दामाशेट्टी शिंपी यांना सापडली व तिचा प्रवेश दामाशेट्टीच्या घरात कामकरी मुलगी म्हणून झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर नामदेव शिंपी व्यवसाय करीत. स्वतः अभंग रचित. नामदेवाची शिष्या जनी हिच्या रचना अतिशय सरस असत. जनीबरोबर विठोबा तिची सर्व कामे करतो अशा अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. याचाच अर्थ ती विठ्ठलभक्तीत मग्न झाली. तिचे अभंग तिची स्वतःची वेगळी प्रतिमा दर्शवितात. क्षुद्र स्त्रीला होणाऱ्या यातना तिच्या काव्यातून व्यक्त होतात. ती म्हणते, 'राजाई गोणाई, अखंडित तुझे पायी, मज ठेविले द्वारी, नीच म्हणोनी बाहेरी."

यातूनच जातिव्यवस्था आणि उच्च-नीचता समाजात कशी रुजली होती हे दिसते. त्यामुळे सामाजिक क्षमतेची मागणी तिच्या अभंगातून दिसते. आजही वारकऱ्यांच्या रोजच्या भजनात तिचे अनेक अभंग गायले जातात.

"डोईचा पदर खांद्यावरती, भरल्या बाजारी जाईन मी,<br>
जनी म्हणे मी वेसवा, निघाली केशवा तुझ्या दारी ।"

चारचौघींसारखे चाकोरीत राहण्यापेक्षा बाहेर पडून आलेली बदनामी ती स्वीकारते. जनाबाई ही सामान्यातून असामान्यत्व मिळविणारी स्त्री. जन्म, शिक्षण, कौटुंबिक स्थान, सामाजिक दर्जा याबाबत ती खालच्या दर्जाची पण जातिवंत कविमन, साधीसोपी गोड वाणी, लोकप्रियता याबाबत ती उजवी ठरली असे मत इंदुमती शेवडे यांनी मांडले आहे. (संत कवयित्री, पृ. ११८)

**८. वेणाबाई (१६२७ ते १६७८)** : ही समर्थ रामदासांची पट्टशिष्या. तिच्याबद्दलची त्रोटक माहिती रामदासी वाङ्मयात मिळते. त्यानुसार कोल्हापूरच्या गोपाजीपंत देशपांड्यांची ही कन्या. ती बालविधवा झाली. समर्थ रामदास भिक्षेसाठी घरी आल्यावर ती रामदासांना भेटली व त्यांची शिष्या बनली. बालविधवेने शिष्यत्व पत्करल्यामुळे माहेरी व सासरच्या लोकांच्या टीकेला तिच्या कुटुंबाला तोंड द्यावे लागले. म्हणूनच ती म्हणते,

"कोणी वंदिती, कोणी निंदिती, वाट मी त्यांची पाहीन."

रामदासी मठांमध्ये वेणाबाईचे स्थान महत्त्वपूर्ण होते. रामदासांनी मिरजेस मठस्थापना करून तिला रामदासी पंथाचा प्रचार करण्यास पाठविले. काशीचा सुप्रसिद्ध ब्राह्मण गागाभट्ट वेणाबाईच्या विद्वत्ताप्रचुर विवेचनाने खुश झाला. वेणाबाईचे सर्व काव्य रामस्तुतीवर आहे. त्यामध्ये 'सीतास्वयंवर' हे काव्य सर्वाधिक लोकप्रिय आहे. मिरजेच्या मठाचे प्रमुखत्व तिने वीस वर्षांपर्यंत सांभाळले.

**९. आक्काबाई** : कऱ्हाडच्या रुद्राजीपंत देशपांड्यांची ही बालविधवा कन्या. ती रामदासी होती. रामदासांच्या कार्याला तिने वाहून घेतले. तिच्याकडे चाफळ व परळी मठाची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी होती. रामदासांच्या मरणसमयी ती त्यांच्या जवळ होती. रामदासांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या स्वारीच्या काळात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या मठांतील राममूर्तींचे संरक्षण तिने केले. हिंदूंवर आलेल्या संकटामुळे चाफळ-परळीच्या मठाची व्यवस्था तिने ३० वर्षे सांभाळली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर छ. शाहू याने आपल्या सुटकेनंतर चाफळला आक्काबाईची भेट घेऊन मदतीचे आश्वासन घेतले. छ. शाहूंनी रामदासांचा पुतण्या गंगाधरपंत याची मठ-व्यवस्थेसाठी नेमणूक करून रामदासांच्याबद्दलचा आदर टिकविला. इ.स. १७२१ मध्ये परळीतच तिचा मृत्यू झाला.

**१०. नांगरी** : महाराष्ट्रातील इतर स्त्रियांमध्ये नामदेवाचे बंधू रामदेव यांची कन्या 'नांगरी' व विठ्ठलाच्या भक्तीत गर्क झालेली 'विठाबाई' जिने चिदंम्बरम् स्वामीचे शिष्यत्व स्वीकारले होते. यांची नावे महत्त्वपूर्ण ठरतात.

**११. कान्होपात्रा** : कान्होपात्रा हिचा कालखंड १४६८ चा असावा असे मत

वि. का. राजवाडे यांनी मांडले आहे. ही मंगळवेढ्याच्या शामा या गणिकेची मुलगी होती. जी अतिशय सुंदर होती. तरुणपणात तिनेही गणिका म्हणून व्यवसाय करावा अशी तिच्या आईची इच्छा होती. पण कान्होपात्राने यास विरोध केला. तिने बिदरच्या जनानखान्यात राहण्याचे नाकारले व पुढे तिला पंढरीच्या वारकऱ्यांची भजने ऐकण्याचा छंद लागला. तिने गृहत्याग करून पंढरपुरास स्थलांतर केले. तिथे विठ्ठलभक्ती व संतांच्या संगतीत विरक्त जीवन जगू लागली. पांडुरंगाचे सावळे सगुण रूप पाहून तिने मनाने पांडुरंगाला वरले. तिथेही तिचे लावण्य तिला धोकादायक ठरले असे तिच्या अभंगावरून दिसते. विठोबाच्या सान्निध्यात राहत असताना कोणीतरी बिदरच्या बादशहाकडे तिच्या सौंदर्याचे गुणगान केले. बिदरच्या बादशहाने तिला आपली रखेली करण्यासाठी जबरदस्तीने नेण्याचा प्रयत्न केला. तिला घेऊन जाणाऱ्या बादशहाच्या शिपायांना तिने सांगितले, 'तुम्ही येथे थांबा, मी मंदिरात जाऊन देवाचा निरोप घेऊन येते.' त्याप्रमाणे तिने पांडुरंगासमोर अभंगातून संकटातून सोडविण्यासाठी पांडुरंगाची प्रार्थना केली. ती म्हणते -

''पुरविले पाठ न सोडी टवळ ।
अधम चांडाळ पापराशी ॥
वरिता नायके दुष्ट दुराचार ।
काय करू विचार पांडूरंगे ॥
तू माय माऊली जगाची जननी ।
म्हणवोनी मिठी चरणी घालीत असे ।
विनवी कान्होपात्रा जोडोनिया हात ।
आता देहअंत समय आला ॥''

याबाबत असे सांगितले जाते की, तिथेच तिचा देह विठ्ठलाच्या पायाशी अचेतन झाला. तिचे प्रेत दक्षिणद्वारात पुरले व तिला बिदरच्या बादशहाच्या संकटातून देवाने वाचविले. तिच्या मृत्यूनंतर भाविकांनी दक्षिण द्वारात तिची मूर्ती बनविली.

महिपतीकृत 'भक्तविजय' या ग्रंथात तिचे चरित्र आले आहे. तिचे २५-३० स्फूट स्वरूपाचे अभंग उपलब्ध आहेत. सुबोधता, आर्तता आणि आत्मनिष्ठा ही तिच्या अभंगांची वैशिष्ट्ये आहेत. तिचा -

''नको देवराया अंत आता पाहू ।
प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ॥''

हा अभंग वारकरी आजही भक्तिभावाने गातात.

**१२. लल्लेश्वरी :** काश्मीरमधील गूढवादी कवयित्री म्हणून लल्लेश्वरी ही प्रसिद्ध आहे. सर रिचर्ड टेंपल यांनी तिचा चरित्रग्रंथ लिहिला आहे. लहानपणी लग्न

झालेली लल्लेश्वरी संसारात रमली नाही. त्यामुळे सासरी तिचा छळ झाला. तिने शैवसंत सेदबाबू यांचे शिष्यत्व पत्करले. ती कुशाग्र होती. शेवटच्या जीवनात भौतिक पाशातून मुक्त होऊन भक्तिप्रसारासाठी भटकत राहिली त्यामुळे समाजाकडून तिचा असहनीय छळ झाला.

**१३. शबरीबाई** : ही नागरब्राह्मण जातीची डुंगरपूरची रहिवासी. १७५९ मध्ये तिचा जन्म झाला. ती बालविधवा होती. वैधव्यानंतर तिने आपले सर्व जीवन ज्ञान भक्तिसाधनेत खर्च केले. तिने अनेक कविता लिहिल्या. त्यापैकी ६५२ कवितांचा एक संग्रह उपलब्ध झाला. ही मध्ययुगात गुजरातमध्ये सुप्रसिद्ध अशी संतकवयित्री होऊन गेली.

**१४. दिवालीबाई** : ही बडोदे शहराजवळील डभोर या गावातील एक ब्राह्मण कन्या. दुष्काळामध्ये मुलीला सांभाळणे अशक्य झाल्याने तिच्या वडिलांनी तिला साधूंच्या स्वाधीन केले. साधूने दिलेल्या उत्कृष्ट शिक्षणामुळे रामायणावर तिची भक्ती बसली. तिने रामायणातील रामजन्म, बालक्रीडा, विवाह, राज्याभिषेक वगैरे प्रसंगांवर अनेक काव्ये रचली.

**१५. जनीबाई** : शाक्तपंथीय मिथुमहाराज नावाचे साधु १८ व्या शतकात गुजरातमध्ये होऊन गेले. त्यांची जनीबाई शिष्या. १८०२ मध्ये तिने 'नवनायिकादर्शन' नावाचे काव्य लिहिले. आपल्या गुरूच्या जन्माची कहाणी ''नाथजी-प्राकट्य'' या काव्यात तिने वर्णन केली आहे. तत्त्वज्ञान व गूढवाद तिने उत्तम रीतीने व्यक्त केले. मिथुमहाराज व जनीबाई या दोघांच्या लिखाणातून शाक्तपंथाची कल्पना येते.

**१६. हट्टीविद्यालंकार** : १६ व्या व १७ व्या शतकातील वैष्णव पंथातील स्त्रियांचे संस्कृतवर चांगले प्रभुत्व असे. त्यामध्ये चंद्रावती, आनंदमयी व गंगामयी, गंगामणी यांचा उल्लेख करावा लागतो. यांच्याबद्दल समाजात आदरभाव असे. १८ व्या शतकात हट्टीविद्यालंकार ही बंगालमधील संस्कृत विदुषी म्हणून प्रसिद्ध होती. तिने 'चतुष्पाठी' या नावाने स्वतंत्र शिक्षणकेंद्र स्थापन केले होते. या ठिकाणी संस्कृतमधील सर्वश्रेष्ठ वाङ्मयाचा अभ्यास केला जाई. बरद्वानच्या पश्चिमेस असणाऱ्या सोनार गावची ही रहिवासी. ती उतारवयात काशीला गेली. तिने वृंदावनला राहून अध्यापन केले. तिने रचलेली भक्तिगीते आजही ब्रीजभाषेतील उत्कृष्ट काव्याचे नमुने मानले जातात.

## सूफीसंत स्त्रिया

सूफी तत्त्वज्ञानाचा भारतामध्ये १४ व्या शतकापासून प्रचार व प्रसार झाला. १६ व्या शतकात सूफीसंत स्त्रियांचे प्रमाण भारतात बरेच वाढले. शेख अब्दूल हक मुहद्दीस दिल्लवी, ख्वाजा बाकी बिल्लाह आणि मियाँ मीर या महान सूफीसंतांच्या

माता या सूफी तत्त्वज्ञ होत्या. ख्वाजा बाकी बिल्लाह याच्या दोन्ही पत्नी सूफी तत्त्वज्ञ होत्या. बीबी जमाल खातून ही मियाँ मीर यांची बहीण होती. लाहोर येथे स्थायिक झाल्यावर मियाँ मीर यांचे बंधू काजी ताहीर व बहीण बीबी जमाल खातून यांनी कादिरिया सिलसिलांचे सूफी तत्त्वज्ञान लोकांसमोर मांडले. लग्नानंतर १० वर्षांनी आपल्या पतीपासून तलाक घेऊन सूफी तत्त्वज्ञानाचा प्रचार करत नमाज, ध्यान, चिंतन करून संन्यस्थ अवस्थेत आपले जीवन व्यतीत केले. सूफी साधनेची बरीच तत्त्वे मियाँ मीरने आपली धाकटी बहीण बीबी जमाल खातून याकडून घेतली. त्याने आपल्या बहिणीच्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख आपल्या लिखाणातून केला आहे. तिचा मृत्यू मे १६४७ मध्ये झाला. बीबी जमाल खातून या सूफीसंत स्त्रीचे उल्लेख दाराशुकोह यांनी आपल्या लिखाणात केले आहेत. तिला भारतीय सूफी व तत्कालीन कालखंडातील 'राबिया' असे म्हटले आहे. राबिया या खिलाफत काळातील बगदादमधील महान महिला सूफीसंत होऊन गेल्या. त्यामुळे दाराशुकोहने बीबी जमालांना राबियाची उपमा दिली आहे.

दाराशुकोहची मोठी बहीण जहानआरा बेगम ऊर्फ बेगमसाहिबा ऊर्फ पादशहाबेगम हिचा जन्म २ एप्रिल, १६१४ रोजी झाला. ती दाराशुकोहपेक्षा एक वर्षाने मोठी होती. ती बादशहा शहाजहानची लाडकी मुलगी व दाराशुकोहला प्रिय अशी कुटुंबवत्सल बहीण होती. ती चिस्ती सिलसिल्याशी संबंधित असलेली सूफीसंत होती. ती स्वतःबद्दल लिहिते, 'मी या तैम्मूर वंशातील एकमेव व पहिली महिला सूफी विदूषी आहे.' तिने इ.स.वी. १६३९-४० मध्ये अजमेरच्या ख्वाजा मोईनउद्दीन चिस्ती यांचे जीवनचरित्र लिहिले. या चरित्राचे नाव, 'मुनीस-उल-अरवाह' असे आहे. १६४७ मध्ये तिने कादरिया सिलसिल्याची दीक्षा घेतली व या सिलसिल्यात 'सहाबिया' नामक मुल्ला शहा यांचे चरित्र लिहिले. आपली आई मुमताज महल हिच्या निधनानंतर बादशहा शहाजहानच्या देखभालीसाठी आपले जीवन खर्ची केले. औरंगजेब व इतर भावांच्या यादवीमध्ये तिने दाराशुकोहची बाजू घेतली होती पण ती अपयशी ठरली. तिने अविवाहित राहून नंतरचा काळ सूफी तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसारात घालवला. तिचा मृत्यू सप्टेंबर १६८१ साली झाला.

## संत स्त्रियांची वैशिष्ट्ये

सन १२०० ते १७०० या काळातील या सर्व संत स्त्रिया विवाहित, अविवाहित, बालविधवा, काही शूद्र जातींतील, तर काही सुफीसंत स्त्रिया होत्या. स्त्रियांच्या बहुतेक साऱ्या अवस्था आणि काही जातिस्तर यात समाविष्ठ झाले आहेत. इतर चारचौघींप्रमाणे प्रवाहपतितासारखे जीवन जगण्यापेक्षा प्रत्येक संत स्त्रीने आपल्या कालखंडानुसार, ताकदीनुसार, जाणीवपूर्वक काही वेगळेपण मिळविले आहे.

स्वअस्तित्वासाठी झगडणाऱ्या या स्त्रियांत जिवंत मानवीपणाची खूण तर आहेच पण यांनी आपण पुरुषांप्रमाणेच कर्तृत्ववान आहोत हेही लिखाणातून स्पष्ट केले आहे. खालील वैशिष्ट्यांतून त्यांचे तत्कालीन परिस्थितीतील वेगळेपण जाणवते.

१. संत स्त्रियांनी त्याच्या लोकभिमुख प्रवचन व उपदेशामुळे जातिभेद, वर्णभेद दूर करण्याचा प्रयत्न केला.

२. धर्मकृत्ये व ब्राह्मणाचे दोष उघडकीस आणून समानतेचा पुरस्कार केला. आधुनिक युगाची पार्श्वभूमी तयार केली.

३. भक्ती चळवळीने धर्मांतराच्या लाटेलाच थोपवले नाही तर सामाजिक अत्याचारांना मृदू करून हिंदू समाजाला धर्मांतरापासून रोखले.

४. रूढीतील पोकळपणा संत स्त्रियांनी दाखवला. संत चळवळीतील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या चळवळीत भारतभर स्त्री संतांची मालिकाच तयार झाली.

५. भक्तिमार्गाने धर्माची कवाडे उघडून पती किंवा धर्मगुरू यांच्याखेरीज मोक्षाला जाता येते  हे भक्ती चळवळीने स्पष्ट केले.

६. संत स्त्रियांनी जातिभेदावर आघात केला तरी सामाजिक चौकटी फारशा बदलल्या नाहीत. धर्मकृत्यातील पोकळपणाला आवाहन मात्र दिले. संत स्त्रियांनी मूर्तिपूजा नाकारून आत्मा हेच मंदिर आहे आणि त्यातूनच ईश्वराशी तादात्म्य पावू शकतो हे दाखवले.

७. संत स्त्रिया सर्व जातिधर्मातून व थरातून आल्या. संत स्त्रियांचे लिखाण बोलीभाषेतून असल्याने सामान्य स्त्रियांपर्यंत तें पोहोचले. मराठी साहित्यातील संत कवयित्रीच्या भक्तिकाव्यात विविध छटा दिसतात. महादाइसेच्या प्रेमविषयक भावना व्यक्त करणाऱ्या 'लीळा', मुक्ताबाईचे काव्य, चिंतनात्मक व स्वःचा शोध घेणारे बहिणाबाईचे काव्य, भावनिक श्रद्धामय अशी वेणाबाईची रचना, वैविध्याने नटलेली साहित्यक्षमता संत स्त्रियांकडे होती.

अनेक प्रवाहांनी बनलेली ही चळवळ होती. त्यात प्रांतानुसार विविधता असली तरी त्यातून स्त्री-स्वातंत्र्याची व मुक्तीची धडपड सातत्याने दिसते. या स्त्रियांनी ईश्वर गुणगान करताना संसारात, संसाराबाहेर ईश्वरसेवेत जीवन खर्च केले. या संत स्त्रिया देशाच्या विविध भागांमधून उदयास आल्या. स्त्री संतांच्या लिखाणातून संवेदनशीलता व चित्त विचलित करणाऱ्या भावना दिसतात. संत स्त्रियांच्या कार्याची जमेची बाजू म्हणजे सामान्य स्त्रिया गृहस्थाश्रमातून राहत. तरीही त्यांना आध्यात्मिक जीवनाचा दर्जा मिळाला. पत्नी, माता या भूमिकेतही हा दर्जा मिळाला. प्रस्थापित धर्माला त्यांनी आव्हान दिल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागला. तरीही त्यांनी बऱ्याचदा

सामाजिक विषमता व अत्याचारी सामाजिक परंपरा, चालीरीती यांच्याविरुद्ध बंड केले नाही म्हणजेच स्वतःला सामाजिक मुक्तिदाता न समजता व्यक्तिगत स्वातंत्र्य मिळविण्याचे प्रयत्न केले. भक्तिगीते लिहून प्रेमिका, पत्नी, आई ह्या भूमिका स्पष्ट केल्या. हा त्यांच्या कौटुंबिक जीवनाचा विस्तार होता. त्या काही प्रमाणात सांसारिक जीवनाच्या पलीकडे जाऊ शकल्या. संत स्त्रियांच्या चळवळीचा अदृश्य परिणाम म्हणजे कथा-कीर्तनांच्या माध्यमातून स्त्रियांची गृहकेंद्रित जीवनातील बंधने कमी होऊन पडदापद्धतीसारख्या गोष्टी कमी झाल्या. भजने, कीर्तने यामुळे स्त्रिया समाजजीवनात आल्या. काही वेळेला संत वाङ्मयातील लिखाण कृष्ण-भक्तांकडून राधाकृष्ण, गोपिकांच्या प्रणयलीलांकडे जाते व त्यात स्त्रीला अश्लीलता व उपभोग्य वस्तू म्हणूनही पाहिले जाते.

संत कवयित्रीच्या भक्तिकाव्यातून धर्म आणि चालीरीती याबाबत अनेक प्रश्न त्यांनी उभे केले. त्यांचा अर्थ आजच्या स्त्री-मुक्तीच्या संदर्भात लावण्याचा प्रयत्न केल्यास समानतेचा ध्यास घेणारी, वैयक्तिक स्वातंत्र्याचा प्रश्न मांडणारी, स्व-शोधासाठी भक्तिमार्गाची वाट चोखाळणारी मध्ययुगीन स्त्री यातून दिसते.

दक्षिणेमध्ये ६ व्या शतकात भक्तिमार्गाचा प्रभाव दिसतो. पण त्यानंतर देशाच्या विविध भागांत, वेगवेगळ्या काळांत दक्षिणेपासून ते थेट उत्तरेत काश्मीरपर्यंत आणि पूर्वेस बंगालपासून पश्चिमेस गुजरातपर्यंत संत कवयित्रींचा हा प्रवाह आढळतो. आजपर्यंत भक्तिमार्गाच्या चळवळीचा विचार करणाऱ्या विचारवंतांनी भक्तीच्या वेगवेगळ्या छटांच्या, स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या वेगळ्या वाटा चोखाळणाऱ्या, स्वत्वचा शोध न घेता केवळ काव्याचा विचार केला पण आज तत्कालीन समकालीन साहित्यातून तिची समाजप्रतिमा, शोधप्रतिमा समजावून घेणे आवश्यक आहे. सर्व संत कवयित्रींच्या बाबतीत गृहस्थाश्रमाच्या जबाबदाऱ्या व भक्तिमार्गाची ओढ या दोन्हीतील ओढाताण जाणवते. या अस्वस्थतेचे वर्णन करणारे साहित्य आजच्या स्त्रीला जवळचे वाटू लागले. गुरु-शिष्य नातेसंबंध यातूनच स्पष्ट होतात असे जाणवते.

✦✦✦